रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १५६
www.ramprahar.com
रविवार, २२ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२



## राज्यातील महायुती सरकारचे खातेवाटप जाहीर


**मुंबई** : राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री आणि अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. यानंतर ५ फेब्रुवारीला राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. त्यानंतर हिवाळी अधिवेशनाची सांगता झाल्यावर शनिवारी (दि. २१) रात्री महायुतीने खातेवाटप जाहीर केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्रिपदाची धुरा आपल्याकडे ठेवली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थ, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे नगरविकास व गृहनिर्माण खाते देण्यात आले आहे. सविस्तर खातेवाटप पुढीलप्रमाणे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गृह, ऊर्जा, कायदा आणि न्यायव्यवस्था; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नगरविकास, गृहनिर्माण; अजित पवार अर्थ, राज्य उत्पादन; चंद्रशेखर बावनकुळे महसूल; राधाकृष्ण विखे-पाटील जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे); हसन मुश्रीफ वैद्यकीय शिक्षण, चंद्रकांत पाटील उच्च व तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्यमंत्री; गिरीश महाजन जलसंपदा (विदर्भ, तापी आणि कोकण) **(पान २ वर..)**

# महाराष्ट्राचा समतोल विकास साधणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**नागपूर : प्रतिनिधी**

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकणातील मागास भागासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधत महाराष्ट्रातील जनतेला न्याय देणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि. २१) विधानसभेत दिली. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते.



विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प पूर्णत्वाला नेणार असून मराठवाड्यातील वॉटरग्रीट प्रकल्प मार्गी लावणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. गडचिरोली स्टील सिटी म्हणून उदयास येत असून येत्या तीन वर्षात गडचिरोलीतील नक्षलवाद आटोक्यात आणणार असल्याचा दावा यांनी केला. त्याचबरोबर पीक विमा कंपन्यांच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी करणार असल्याचे स्पष्ट केले.

विदर्भातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प येत्या सात वर्षात मार्गी लावणार आहे. ८८ हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे १० लाख एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे ५५० किलोमीटर लांबीची नवी नदीच तयार होणार असून यामुळे विदर्भात मुबलक पाणी उपलब्ध होणार आहे. मुबलक पाण्यामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासालाही गती मिळेल. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी बळीराजा योजनेमुळे सिंचन क्षेत्र वाढणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सिंचन क्षेत्र वाढण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. कन्हान नदी वळण योजनेला मंजूरी दिली असून ३२०० एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जवळपास १६ हजार २१९ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे, तर धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २० हजार रुपये बोनस देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पीक विमा योजनेबाबत सदस्यांनी काही गंभीर मुद्दे सभागृहात उपस्थित केले आहेत. त्यामुळे या संदर्भात सखोल चौकशी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, राज्यात उद्योगांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उद्योजकांचा कल राज्याकडे वाढला असून पुण्यानंतर छत्रपती संभाजीनगर व जालना ही दोन मोठी औद्योगिक क्षेत्र म्हणून पुढे येत असल्याने मराठवाडा औद्योगिक विकासाचे मोठे दालन होत आहे. वंदे भारत ट्रेन लातूरच्या कोच फॅक्टरीत तयार होत असल्याने येथे रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली.

मुंबई-गोवा महामार्गाच्या कामातील अडचणी दूर करण्यात करण्यात आल्या आहेत. युद्धपातळीवर या प्रकल्पाचे काम सुरू असून हा महामार्ग पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करून गेल्या अडीच वर्षात हाती घेतलेली कामे प्राधान्याने पूर्णत्वाला नेण्यात येणार आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### ■ नागपूर अधिवेशनात १७ विधेयके मंजूर

नागपूर येथील राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाची सांगता शनिवारी झाली. या अधिवेशनात विविध विषयांवर चर्चा झाली. दोन्ही सभागृहात मिळून १७ मंजूर विधेयके मंजूर झाली, तर संयुक्त समितीकडे एक व विधानसभेत एक अशी दोन विधेयके प्रलंबित राहिली आहेत. दरम्यान, पुढील अधिवेशन ३ मार्च रोजी मुंबईत होईल, जे अर्थसंकल्पीय अधिवेशन असणार आहे.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये रोबोट ठरले प्रदर्शनाचे आकर्षण

## विद्यार्थ्यांच्या आविष्काराचे मान्यवरांसह पालकांकडून कौतुक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान व गणित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दोन रोबोट आकर्षण ठरले. संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



विद्यालयात २०, २१ डिसेंबर रोजी प्रदर्शन उत्साहात झाले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी ३००हून अधिक प्रकल्प सादर केले. यामध्ये २० फूट उंच रोबोट आणि छोटा रोबोट मुख्य आकर्षण होते. रोबोट हस्तांदोलन करत व अवतीभोवती फिरून लक्ष वेधून घेत असल्याने पालकांनीही प्रदर्शनाची प्रशंसा केली.

प्रदर्शनात रामसेतू (रामेश्वरम) येथून आणलेले तरंगते पाषाण ठेवण्यात आले होते. अनेकांनी या पवित्र पाषाणाचे दर्शन घेतले.

प्रदर्शनास लोकनेते रामशेठ ठाकूर व व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी भेट दिली. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पाटील, मुख्याध्यापिका राज अलोनी उपस्थित होते.

## निवडक

### कंटेनर कारवर कोसळून सांगलीतील सहा जणांचा मृत्यू

**बंगळुरू** : सांगली-बंगळुरू महामार्गावर कंटेनर ट्रक हा कारवर उलटल्याने एकाच कुटुंबातील सहा जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. चंद्रम इगाप्पागोळ हे मूळचे सांगलीच्या जत तालुक्यातील मोराबागी गावचे रहिवासी, जे बंगळुरूमध्ये सॉफ्टवेअर कंपनीत होते. गावी परतताना बंगळुरू जिल्ह्यातील नेलमंगळा तालुक्यात तळकेरेजवळ हा अपघात घडला.

### उपमुख्यमंत्री अजित पवारांनीही घेतली देशमुख कुटुंबियांची भेट

**बीड** : मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या झाली. या घटनेचे पडसाद उमटले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी शनिवारी (दि. २१) देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील देशमुख कुटुंबियांची भेट घेत या घटनेतील मास्टरमाईंड कोणीही असो, त्याला सोडणार नाही. आरोपींवर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

# रामबाग उद्यानाचा आज वर्धापन दिन सोहळा

## पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांचा बहारदार कार्यक्रम रंगणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दुबईतील 'मिरॅकल गार्डन'च्या धर्तीवर पनवेल तालुक्यातील न्हावेखाडी येथे साकारलेल्या 'रामबाग' या निसर्गरम्य उद्यानाच्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त रविवारी (दि. २२) श्री सत्यनारायण महापूजा व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.



या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेल विधासभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्राच्या नावलौकिकात भर टाकणारी अशी स्वर्गसुखाचा आनंद देणारी रामबाग साकारली आहे. १४ एकर जागेतील या उद्यानात भव्य आणि सुरेख प्रवेशद्वार, निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या विविध रचना, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, लहान मुलांसाठी खेळणी, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे अशा सर्व बाबी आकर्षक आणि मनमोहक आहेत. सायंकाळी या उद्यानाचे रूप बदलते. त्या वेळी असणारी विद्युत रोषणाई अक्षरशः डोळ्यांचे पारणे फेडणारी आहे. त्यामुळे राज्यातील निसर्गप्रेमी या ठिकाणी मोठ्या संख्येने भेट देत आहेत. **(पान २ वर..)**

# तरुणाकडून वृद्ध महिलेवर अत्याचार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर येथे एका १८ वर्षाच्या तरुणाने ८० वर्षीय वृद्ध महिलेवर अत्याचार केल्याची धक्कादायक व माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोपी सिद्धेश घोणे याने १ जुलै ते १९ डिसेंबरदरम्यान पिडीत वृद्ध महिलेच्या घरात घुसून अत्याचार केले. पीडित महिलेने विरोध केला असता आरोपीने तिला मारहाण करून खाली जमिनीवर आपटले व जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

# बोट अपघातातील आणखी एक मृतदेह सापडला

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईच्या गेट वे ऑफ इंडिया येथून घारापुरीकडे निघालेल्या प्रवासी बोटीला नौदलाच्या स्पीड बोटीने धडक दिल्यानंतर बेपत्ता असलेल्या सात वर्षांच्या मुलाचा मृतदेह शनिवारी (दि. २१) शोधमोहिमेत सापडला. त्यामुळे या अपघातातील मृतांची संख्या १५वर पोहचली आहे.

या अपघातात १५ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी घटनेच्या दिवशी १३ मृतदेह सापडले होते. त्यानंतर हंसाराम भाटी यांचा मृतदेह शुक्रवारी अपघातग्रस्त नीलकमल बोटीच्या सांगाड्यात सापडला होता, पण अपघाताला ४८ तासांहून अधिक कालवधी झाला असतानाही सात वर्षांचा मुलगा जोहान निसार अहमद हा बेपत्ता होता. शनिवारी त्याचाही मृतदेह सापडला आहे. त्याच्या शोधासाठी तटरक्षक दलाच्या बोटी व हेलिकॉप्टर तैनात करण्यात आले होते.

दरम्यान, या प्रकरणी कुलाबा पोलीस ठाण्यात नौदलाच्या स्पीड बोटीचा चालक आणि इतर संबंधित व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे नीलकमल बोटीमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी आढळल्याने मुंबई सागरी मंडळाने अखेर आता बोटीचा प्रवासी परवाना, नोंदणी प्रमाणपत्र आणि सर्व्हे प्रमाणपत्र निलंबित केले आहे तसेच बोटीतील डेकची जबाबदारी असणाऱ्या बोट मास्टर व इंजिनची जबाबदारी असणाऱ्या इंजिन ड्रायव्हरची चौकशी सुरू आहे.

# प्रसिद्ध जंजिरा जलदुर्ग पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी

## शैक्षणिक सहलींची विशेष पसंती

**मुरूड : प्रतिनिधी**

निसर्गरम्य मुरूड डिसेंबर महिन्यात पर्यटकांनी गजबजले आहे. मुरूडसह काशिद बीच आणि ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी शैक्षणिक सहली मोठ्या प्रमाणावर हजेरी लावत असल्याने हॉटेल, लॉजिंग व्यवसाय तेजीत दिसत आहेत.

मुरूडपासून अवघ्या पाच किमी अंतरावर असलेल्या राजपुरी गावाच्या दक्षिणेस भर समुद्रात जंजिरा जलदुर्ग इतिहासाचा मूक साक्षीदार म्हणून ३५० वर्षांपासून अभेद्य पहारेकऱ्यासारखा उभा आहे. २२ एकर परिसरातील या महाकाय किल्ल्याला २२ बुरूजांची तटबंदी तोफांसह आहे.

राजपुरी आणि खोरा बंदरातून शिडाच्या वा यांत्रिक बोटींनी किल्ल्यात जाता येते. देश-विदेशातील हौशी तसेच इतिहासप्रेमी पर्यटकांना सूर्योदय ते सूर्यास्तादरम्यान किल्ला दर्शन घडू शकते. जंजिरा जल वाहतूक संस्थेकडून प्रौढ व्यक्तीस ६० रुपये, तर १२ वर्षापर्यंत ३० रुपये आकारले बोटीच्या प्रवासासाठी आकारले जातात.

राजपुरी गावातील सुमारे १५० कुटुंबांची उपजिविका जलप्रवासी वाहतुकीवर अवलंबून असून छोटे छोटे ४० ते ५० स्टॉलधारक टोप्या, नारळ पाणी, रसवंती, चहा, फराळाचे स्टॉल्स तसेच भोजनालये आदींची मदार पर्यटकांवर असते.

ऐतिहासिक जंजिऱ्यात शैक्षणिक सहली मुख्यतः उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आदी लांबून येत असून डिसेंबर महिन्यात सहलींची उच्चांकी नोंद होते.

अलिकडे मुरूड समुद्र किनाऱ्यावर चांगल्या पद्धतीने सुशोभीकरण होत असून सुमारे २००हून अधिक वाहने वाहनतळावर पार्क होऊ शकतात. त्यामुळे येथे येणाऱ्यांना ही उत्तम सुविधा झाली आहे.





# आमदारकी वाचवण्यासाठी पर्यटक म्हणून विधानभवनात येऊन गेले!

## उपमुख्यमंत्री शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूरमधील विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाची सांगता झाली. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत या अधिवेशनात झालेल्या निर्णयाची माहिती दिली तसेच विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनीदेखील हजेरी लावली होती. यावरून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाव न घेता खोचक टीका केली.

काहींनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देताना आमदारकीचा राजीनामा देणार असल्याचे म्हटले होते, मात्र आता ते आमदारकी वाचवण्यासाठी पर्यटक म्हणून विधानभवनात येऊन गेले, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.

गेले आठ दिवस सुरू असलेलं हिवाळी अधिवेशन शनिवारी (दि.२१) संपले. या अधिवेशनात चांगले निर्णय घेतले गेले आहेत. खरं तर



आमचे सरकार नव्याने स्थापन झाले नाही तर आमची टीम तिच आहे फक्त मॅच नवीन आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुती सरकारचे कामकाज सुरू झाले आहे. अधिवेशनाचा वेळ कमी असला तरी सर्व कामकाज पूर्ण झाले. अधिवेशनात पुरवणी मागण्या देखील मान्य झाल्या. आमच्या सरकारने ज्या योजना सुरू केल्या त्या योजना सुरू ठेवण्यासाठी जी आर्थिक मदत लागते त्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या सर्व योजना सुरू राहतील. त्या बंद होणार नाहीत, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

विरोधकांनी जे प्रश्न उपस्थित केले त्या प्रश्नांना आम्ही उत्तरे दिली. अधिवेशन काळात मंत्रिमंडळाचा विस्तारही झाला. विधानपरिषदेच्या सभापतींचीही निवड झाली. तसेच पुणे विमानतळाला जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे नाव देण्याचा प्रस्तावही मंजूर झाला आणि आम्ही हा प्रस्ताव केंद्राला पाठवला तसेच विरोधकांनी प्रश्न सभागृहात न मांडता फक्त माध्यमांसमोर आणि सभागृहाच्या पायऱ्यांवर मांडले. नव्या सरकारला आम्ही गती देण्याचा प्रयत्न करणार आहोत. महायुती सरकारची जी गती होती, ही गती अधिक वेगवान झाली आहे, असंही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

कोणत्याही गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचे काम आमचे सरकार करणार नाही. तसेच काही लोक म्हणाले की आमचे मंत्री प्रश्नांची उत्तरे देत नाहीत. तसेच काहीजण आले आणि अधिवेशन विनोदी असल्याची टीका करून गेले. मात्र, काहींनी जेव्हा मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला होता, तेव्हा आमदारकीचा राजीनामा देऊ असेही म्हटले होते, पण ती आमदारकी वाचवण्यासाठी आता फक्त पर्यटक म्हणून इकडे अधिवेशनात येऊन गेले. खरंतर अधिवेशनाला विनोदी म्हणणे म्हणजे हाच मोठा विनोद आहे, असे म्हणत नाव न घेता उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली.

### ‘विदर्भ मराठवाड्यातील पिकांना न्याय देण्याचे काम आम्ही केले’

***नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पत्रकार परिषद झाली. या वेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले, सिंचन असेल उद्योग असेल गेल्या अडीच वर्षात आम्ही मागास भागात परिवर्तन केलेय. पुढील रोडमॅप देखील आम्ही विधानसभेत मांडला आहे. महाराष्ट्रातील मागास भागावर आमचा फोकस आहे. नदीजोड आणि सिंचनावर प्रकल्पांवर आमचा भर असेल. कापसाचा बोनस आपण जाहीर केलाय. सोयाबीनची खरेदी हमीभावाने रेकॉर्डब्रेक खरेदी आपण केली आहे. विदर्भ मराठवाड्यातील पिकांना न्याय देण्याचं काम आपल्या सरकारने केले आहे.***

## मराठी कुटुंबाला मारहाणप्रकरणी आरोपींना सहा दिवसांची पोलीस कोठडी

**कल्याण : प्रतिनिधी**

कल्याणमध्ये मराठी कुटुंबीयांना मारहाण केल्याप्रकरणातील आरोपींची रवानगी पोलीस कोठडीमध्ये करण्यात आली आहे. मारहाण प्रकरणात अटक असलेल्या चारही आरोपींना कल्याणच्या कोर्टामध्ये हजर करण्यात आले होते. यासर्व आरोपींना कोर्टाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

कल्याणमध्ये दोन दिवसांपूर्वी एका मराठी कुटुंबीयांना शेजारी राहणाऱ्या परप्रांतीय व्यक्तीने बेदम मारहाण केली होती. या घटनेमध्ये दोन जण जखमी झाले होते. मराठी माणूस भिकारी असल्याचे भैय्यांनी हिनवलं त्यामुळे हा वाद झाला.

कल्याण पश्चिमेच्या योगीधाम परिसरातील अजमेरा हाईट्स बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या देशमुख कुटुंबियांना मारहाण करण्यात आली होती. देशमुख यांच्या शेजारी राहणाऱ्या महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी अखिलेश शुक्ला यांनी आपल्या काही मित्रांसोबत देशमुख यांच्यावर हल्ला केला होता. देशमुख कुटुंबीयांतील दोन भावांना लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली होती. या मारहाणीमध्ये ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या मारहाणप्रकरणी अखिलेश शुक्ला, त्याची पत्नी गीता शुक्ला सह चार जणांविरोधात गुन्हा दाखल करत पोलिसांनी त्यांना अटक केली होती. अटकेनंतर आज आरोपींना कोर्टामध्ये हजर करण्यात आले होते. कोर्टाने त्यांना सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणात आणखी आरोपी असून त्यांना अटक करणे बाकी आहे, आरोपीकडून मारहाण वेळी शस्त्र रिकव्हरी बाकी आहे, असे पोलिसांनी कोर्टात सांगितले. पोलिसांनी अधिक तपास करण्यासाठी आरोपींची पोलीस कोठडी मागितली. आरोपींवर कट रचणे, गाडीला पिवळी बत्ती वापरणे हे कलम वाढवण्यात आले आहे.

कल्याणमध्ये झालेल्या या घटनेचा संपूर्ण राज्यभरातून निषेध केला जात आहे. या घटनेवरून राजकारणदेखील तापले आहे. या घटनेची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी अखिलेश शुक्ला याला निलंबित केले असल्याची माहिती शुक्रवारी विधानपरिषदेत दिली. मराठी माणसांवर दादागिरी करणाऱ्या माजोरड्यांचा माज उतरवणार असल्याचा इशारा या वेळी मुख्यमंत्र्यांनी दिला. या घटनेचा तपास सध्या खडकपाडा पोलिसांकडून सुरू आहे.



**मुरूड : अजितदादा पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष फैरोज घलटे यांना वाढदिवसानिमित्त प्रमुख नेते मनोज भगत, अजित कासार, तालुका महिला अध्यक्ष मृणाल खोत, सचिव विजय पैर, शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, उपसरपंच इस्माईल सिद्दिक, सायबर सेलचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन, सुपारी संघाचे संचालक दिवेकर, माजी सरपंच योगेंद्र गोयजी आदींनी शुभेच्छा दिल्या.**

### निवडक

## गाडगेबाबा पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम



**रोहे :** सुधागड तालुका परिट समाज चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने श्री संत गाडगेबाबा यांची ६८ वी पुण्यतिथी उत्साहात साजरी करण्यात आले असून या निमित्ताने विविध कार्यक्रम रोह्यात घेण्यात आले. या वेळी विभागीय कोकण अध्यक्ष नंदकुमार राक्षे, पत्रकार पुरुषोत्तम घाग, दिनेश घाग श्री बाबुराव काणेकर, संतोष पाबरेकर, मनोज सुर्वे, किशोर सुर्वे, दिलीप सुर्वे, विजय सुर्वे, राजेंद्र सुर्वे, चंद्रकांत शेडगे, ज्ञानेश्वर सुर्वे, प्रवीण सुर्वे, दीपिका शेडगे, शीला सुर्वे, दिव्या सुर्वे, आठवले, एसटी कंट्रोलर व्ही.डी.डी सेठ, सफाई कामगार विद्याताई चोरगे आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

## राज्यातील महायुती सरकारचे खातेवाटप जाहीर

गणेश नाईक वनमंत्री; गुलाबराव पाटील पाणीपुरवठा आणि स्वच्छता; दादा भुसे शालेय शिक्षण; संजय राठोड जलसंधारण; धनंजय मुंडे अन्न व नागरी पुरवठा; मंगलप्रभात लोढा कौशल्य विकास; उदय सामंत उद्योग आणि मराठी भाषा; जयकुमार रावल विपणन; पंकजा मुंडे पर्यावरण आणि हवामान बदल, पशुपालन; अतुल सावे ओबीसी, डेअरी विकास आणि अक्षय ऊर्जा; अशोक उईक आदिवासी विकास; शंभूराज देसाई पर्यटन व खाण स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय; आशिष शेलार माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक; दत्ता भरणे क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक; आदिती तटकरे महिला व बालकल्याण; शिवेंद्रराजे भोसले सार्वजनिक बांधकाम; माणिकराव कोकाटे कृषी; जयकुमार गोरे ग्रामविकास, पंचायतराज; नरहरी झिरवाळ अन्न व प्रशासन; संजय सावकारे वस्त्रोद्योग; संजय शिरसाट सामाजिक न्याय; प्रताप सरनाईक वाहतूक; भरत गोगावले रोजगार हमी व फलोत्पादन; मकरंद पाटील मदत व पुनर्वसन; नितेश राणे मत्स्य व बंदरे; आकाश फुंडकर कामगार; बाबासाहेब पाटील सहकार; प्रकाश अबिटकर आरोग्य व कुटुंब कल्याण; राज्यमंत्री आशिष जैस्वाल अर्थ, कृषी, मदत व पुनर्वसन; माधुरी मिसाळ शहर विकास, वाहतूक, सामजिक न्याय, आरोग्य, शिक्षण, अल्पसंख्याक विकास; पंकज भोयर गृह (ग्रामीण), गृहनिर्माण शालेय शिक्षण, सहकार; मेघना बोर्डीकर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा, ऊर्जा, महिला व बालकल्याण; इंद्रनील नाईक उद्योग, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, पर्यटन; योगेश कदम गृह (शहरी), महसूल, ग्रामीण विकास, पंचायतराज, अन्न व नागरी पुरवठा.

## रामबाग उद्यानाचा आज वर्धापन दिन सोहळा

न्हावेखाडीच्या म्हसेश्वर मंदिर येथे अतिसुंदर असलेल्या या रामबाग उद्यानाच्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी सायंकाळी ५.३० वाजता श्री सत्यनारायण महापूजा व महाप्रसाद, तर रात्री ८ वाजता पंचम निर्मित व गणेश भगत प्रस्तुत सुप्रसिद्ध अभिनेते पंढरीनाथ अर्थात पॅडी कांबळे आणि सोबत ७० कलाकारांचा संच असलेला ’महाराष्ट्राचे आम्ही मराठी’ हा पारंपरिक लोकगीते व कोळीगीतांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. यासाठी प्रवेश विनामूल्य आहे.

या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, श्री म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी.एल. ठाकूर, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील यांनी केले आहे.

## पालीत होणार खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील यांचा सत्कार

**पाली : प्रतिनिधी**

माणसातील माणुसकी आपुलकीने जपणारे व्यासपीठ म्हणून प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानने प्रचंड नावलौकिक मिळवले आहे. महाराष्ट्रातील होतकरू आणि प्रतिभावंत कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा ग.बा. वडेर हायस्कुल रंगमंच पाली, ता.सुधागड जिल्हा रायगड, बुधवार १८ डिसेंबर २०२४ पासून मंगळवार २४ डिसेंबर २०२४ या कालावधीपर्यंत होणार आहेत.

रविवार २२ डिसेंबर २०२४ रोजी राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांचा तर मंगळवार २४ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता पेण सुधागड रोहा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे, अशी माहिती कार्यकारणी मंडळाचे अध्यक्ष वेत्रवान गुरव, उपाध्यक्ष अभिजीत चांदोरकर, सचिव शरद निकुंभ व अन्य पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

या सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. खासदार धैर्यशील पाटील यांनी संघर्षातून आपले नेतृत्व



कर्तृत्व सिद्ध केले आहे. तळागाळातील जनतेचा कैवारी , आणि उपेक्षित गोरगरीब जनतेच्या मनातील नेता म्हणून त्यांच्याकडे आदराने पाहिले जाते.

बहुजनांचा आधारवड म्हणून त्यांची ओळख आहे, सर्वसामान्य जनतेत पाण्याप्रमाणे मिसळून जाणारा कर्तृत्ववान नेता म्हणून त्यांना पाहिले जाते, आपल्या सौम्य स्वभाव व मधुर वाणीने ते सर्वांची मने जिंकतात, सर्वसामान्य जनतेचे प्रश्न समस्या सोडवण्यासाठी अखंडपणे धडपडत असतात, अन्याय अत्याचाराविरोधात असंख्य चळवळी आंदोलना च्या माध्यमातून त्यांनी सर्वसामान्य शोषित जनतेला न्याय मिळवून दिला आहे.

धैर्यशील पाटील हे राज्य सभेवर खासदार म्हणून गेले असले तरी सर्वसामान्य जनतेला आपणच खासदार असल्याची भावना आहे, इतके धैर्यशील पाटील हे सर्वसामान्य जनतेशी एकरूप झाले आहेत, त्यांची नाळ जोडली आहे. यानिमित्ताने अशा नेत्याचा पाली नगरीत सत्कार होत असल्याने पालीकर नागरिक व कार्यकर्त्यात उत्साही वातावरण दिसून येत आहे.

आमदार रवींद्र पाटील यांनी आपल्या कारकिर्दीत कोट्यवधी निधीची विकास कामे आणून मतदार संघाचा झपाट्याने विकास साधला आहे, अत्यंत मितभाषी, संयमी व ज्येष्ठ असूनही सर्वांना आदराची वागणूक देणारे नेते म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते, विकासदृष्टी ठेवून त्यांनी जनतेचे प्रश्न व समस्या जलदतेने सोडविण्यावर नेहमीच भर दिला आहे. त्यामुळे त्यांचा यथोचीत सन्मान करण्याचे प्रतिष्ठानने आयोजले आहे. प्रकाशभाऊ देसाई व विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उल्लेखनीय व प्रभावशाली कामगिरी बद्दल सत्कार केला जात आहे.

राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेनिमित्त मंगळवार २४ डिसेंबर २०१४ सिने अभिनेते प्रशांत दामले व सिने नाट्य अभिनेत्री कविता मेडेकर यांच्या एका लग्नाची पुढची गोष्ट या खास प्रयोगाचे सादरीकरण होणार आहे. राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेतील विजेत्यांचा बक्षीस समारंभ सिने अभिनेते प्रशांत दामले व सिने नाट्य अभिनेत्री कविता मेडेकर यांच्या हस्ते होणार आहे.

## गव्हाण विद्यालयात स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसंत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

प्रारंभी सकाळ सत्रात लोकसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या हस्ते झाले. या वेळी संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख बाबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, गुरूकुल प्रमुख संदिप भोईर, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, इ.नववी ब च्या वर्गशिक्षिका चारुशिला ठाकूर, ज्युनिअर कॉलेज शिक्षक माणिक घरत, उमेश पाटील, ग्रंथपाल महेश म्हात्रे, शितलकुमार म्हात्रे, प्रशांत परदेशी, योगिता पाटील, प्रणाली पाटील, उर्मिला गोंधळी, विशांत ठाकूर आदी उपस्थित होते.

नववी ब या गुरुकुल वर्गाच्या वतीने आणि इयत्ता बारावी या दोन वर्गांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात शालेय परिसराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता अभियान राबवून लोकसंत गाडगेबाबांना खऱ्या अर्थाने अभिवादन करण्यात आले.



## गव्हाण विद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा संरक्षण दलाच्या उरण विभागाच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये आपत्ती व्यवस्थापन व प्रथमोपचार मार्गदर्शनासंदर्भात प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

या वेळी रायगड जिल्हा नागरी संरक्षण दलाच्या उरण विभाग संरक्षण ब दलाचे विभागीय क्षेत्ररक्षक हरेश्वर जनार्दन ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य गोवर्धन गोडगे तसेच केतन म्हात्रे यांनी केले. या वेळी सरोज हात्रे तसेच क्षेत्ररक्षक ज्ञानेश्वर पाटील, प्रणित म्हात्रे आणि स्वयंसेवक सुजल पाटील, मुद्रा पाटील व शैलेश पाटील आदी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रविंद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, देवेंद्र म्हात्रे व सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील व गुरुकुल प्रमुख संदीप भोईर आदी उपस्थित होते.

आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रात्यक्षिकांस विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले.




## बेणसेत उर्सामध्ये घडले हिंदू मुस्लिम ऐक्याचे दर्शन

### देशभक्तीपर गीतांनी जिंकली उपस्थितांची मने

**पाली : प्रतिनिधी**

सालाबादप्रमाणे यंदाही हजरत शेख अली शा बाबा उर्साचे भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त सामाजिक व धार्मिक कार्यक्रम सादर झाले. या वेळी प्रबोधन, वैचारिक व मनोरंजनपर कव्वालीत अयोध्येतील प्रसिद्ध कव्वाल शाकीब अली साबरी यांनी देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांची मने जिंकली.

भारत ही महान थोर विभूती, संतांची भूमी आहे. या भूमीला शूर-वीर, क्रांतिकारकांचा मोठा वारसा लाभला आहे. या देशात भारतीय संविधानाने सर्वांना समान संधी व समान वागणूक दिली आहे. येथे सारे गुण्यागोविंदाने एकसंघपणे राहतात हेच या देशाचे मोठेपण आहे. देशात महिला युवतींना सुरक्षित



ठेवण्याचा कायदा आहे. प्रत्येक भारतीय नागरिकाला सन्मानाने व स्वातंत्र्यपूर्ण वातावरणात जगण्याची मुभा आहे. आज प्रत्येकाची जबाबदारी व कर्तव्य आहे की, देशाचे अखंडत्व कायम अबाधित राहावे यासाठी योगदान दिले पाहिजे. असा बंधूभाव, एकात्मता जोपासणारा संदेश या देशभक्तीपर गीतातून देण्यात आला. सुमधूर आवाजात गायलेल्या या गीताने सारेच मंत्रमुग्ध झाले. उपस्थितांनी कव्वाल शाकीब अली साबरी यांचे तोंडभरून कौतुक केले व बक्षिसेही दिली.

बेणसे गावाने नेहमीच हिंदू मुस्लिम ऐक्याचा आदर्श जिल्ह्याला दाखवून दिला आहे. त्याचाच प्रत्येय उर्सानिमित्त आयोजित प्रत्येक कार्यक्रमात दिसून आला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना रायगड उपजिल्हा प्रमुख उद्धव कुथे, नामवंत उद्योजक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नाझीम नालखंडे, पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णे, ग्रीन टायगर मंझर जुईकर, अध्यक्ष अजीम बेणसेकर, उपाध्यक्ष मुजीप मोमीन, सेक्रेटरी राहील मांढरे, सद्दाम मोमीन, बशीर मांढरे, अल्लाउद्दीन मोमीन, रिजवान मांढरे, इस्माईल पिट्टू, अन्वर खान, इमरान पठाण, नविद मोमीन आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

### दुखवटा

## पांडुरंग पाटील



**पनवेल :** दिघाटी नवतरुण गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष कै. पांडुरंग काशिराम पाटील यांचे शुक्रवारी (दि.१३) निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कै. पांडूरंग पाटील यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि.२२) श्री. क्षेत्र नाशिक येथे होणार आहे तर उत्तरकार्य विधी मंगळवारी (दि.२४) दिघाटी येथे होणार आहे. तर तेरावेनिमित्त ह.भ.प. सदाशिव महाराह दगडू पाटील यांचे सुश्राव्य किर्तन सकाळी १० ते १२पर्यंत होणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य; विद्यालयांमध्ये उपक्रम

## उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये फ्युजन फँटासिया प्रदर्शन

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये शनिवारी (दि.२१) विज्ञान, गणित फ्युजन फँटासिया प्रदर्शनाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.



दीडशेहून अधिक प्रकल्प प्रदर्शनात ठेवण्यात आले असून आदिवासी नृत्य, द माईम डान्स आणि सायंटिस्ट हे प्रदर्शनाचे आकर्षण होते. तसेच या प्रदर्शनात पालक वर्गाने मोठ्या प्रमाणात सहभाग घेत फ्युजन फँटासिया प्रदर्शनाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांचे त्यांच्या कार्याबद्दल अभिनंदन केले. रामसेतू (रामेश्वरम) येथून आणलेल्या तरंगत्या पवित्र दगडाचे अनावरण व प्रदर्शन हे मुख्य आकर्षण होते.

कार्यक्रमाला आरटीपीएस उलवे अध्यक्ष भार्गव ठाकूर, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, शाळा समिती सदस्य जयवंत देशमुख, भाजप नेते किशोर पाटील, जे. बी. एस. पी. संस्थंचे सिव्हिल इंजिनीअर दर्शन ठाकूर आदी उपस्थित होते.

राज अलोनी, डायरेक्टर प्रिंसिपल आरटीपीएस उलवे, एसएसआरटीपीएसच्या प्राचार्या मुक्ता खटावकर, रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेजचे, खारघर येथील प्राचार्य निशा नायर आदी मान्यवर उपस्थित होते.

जेबीएसपी संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेच्या मुख्याध्यापिका चष्मिंदर बक्षी यांनी मुलांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाची गणपती कारखान्याला भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयातील गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी व्यवसाय मार्गदर्शन अंतर्गत सेक्टर २४ येथील गणपती कारखान्याला भेट दिली.



या गणपती कारखान्याचे मालक नितीन कुंभार यांची विद्यार्थ्यांनी मुलाखत घेऊन त्यांच्याकडून त्यांच्या कलेविषयीची माहिती जाणून घेतली. यामध्ये विद्यार्थ्यांनी कारखाना कधी सुरू झाला, कारखान्यामध्ये दरवर्षी किती गणपती तयार केले जातात, हे गणपती कोणकोणत्या ठिकाणी विक्रीस जातात, हे गणपती बनवण्यासाठी लागणारी माती, रंग कुठून आणले जातात, प्रत्येक वर्षी एकंदरीत गणपती बनवून किती नफा मिळतो आणि नितीन कुंभार यांचे भविष्यातील कारखान्याविषयीचे मत काय आहे या गोष्टी विद्यार्थ्यांनी नितीन कुंभार यांच्याकडून मुलाखतीद्वारे जाणून घेतल्या.

कारखानदार नितीन कुंभार यांनीदेखील विद्यार्थ्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे मनमोकळेपणाने उत्तर देऊन गणपतीविषयी तसेच इतर मूर्तींविषयी अनमोल माहिती विद्यार्थ्यांना दिली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथमच कारखान्याला भेट देऊन कारखान्याविषयी माहिती मिळवली म्हणून नितीन कुंभार यांनी विद्यार्थ्यांचे आणि त्याचबरोबर गुरुकुल प्रमुख तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांचे अभिनंदन केले आणि या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळेला व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर यांनी या क्षेत्रभेटीचे नियोजन केले होते. त्यांच्या समवेत विद्यालयाचे शिपाई अशोक ठाकूरदेखील उपस्थित होते.

## सीकेटी विद्यालयात पालक सभा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पहिल्या सत्राच्या परीक्षा संपल्यानंतर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यम माध्यमिक शाळेत पालक-शिक्षक सभा झाली. या सभेसाठी शिक्षक पालक संघातील अध्यक्ष-उपाध्यक्ष, सचिव-सह सचिव यांच्या सहित शाळेतील शिक्षक व निवड झालेले पालक सदस्य उपस्थित होते.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, वर्तन आणि सर्वांगीण विकासावर चर्चा करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देत पालक आणि शिक्षक यांच्यात प्रभावी संवाद वाढवणे हे या संघाचे उद्दिष्ट आहे. इयत्ता पाचवी ते दहावीच्या पालकांच्या लक्षणीय सहभागासह सभेला चांगली उपस्थिती होती. शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी उपस्थित पालकांचे स्वागत करून सभेला सुरूवात केली.

या वेळी शिक्षक पालक संघातील पालक सदस्यांना शाळेतर्फे विशेष ओळखपत्रे देण्यात आली. आम्ही सतत सहकार्यासाठी उत्सुक आहोत आणि आमच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी पालकांकडून सुरू असलेल्या समर्थनाची आम्ही प्रशंसा करतो, असे शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी व्यक्त केले. या सभेचे सूत्रसंचालन आणि आभार शाळेच्या शिक्षिका पूर्वा खेडेकर यांनी मानले.



## सीकेटी महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज खांदा कॉलनी नवीन पनवेल (स्वायत्त) येथे महाविद्यालयाच्या कर्मचारी अकादमी आणि कल्याण समिती व माधवबाग आणि प्रजापती ग्रुप फाऊंडेशन यांच्या समन्वयाने शनिवारी (दि.२१) महाविद्यालयीन शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माधवबागच्या डॉ. सुनिता पाटील, श्रुती मावळे, शारदा गुंजाळ, रक्षंदा काकडे व प्रजापती फौंडेशनच्या डॉ. यशस्वी चौधरी, डॉ. पूजा बरघारे, डॉ. विश्वजित पाटील व पल्लवी निंबाळकर यांची उपस्थित लाभली.

शिबिरामध्ये सी. बि. सी., कोलेस्ट्रोल, रक्तशर्करा तपासणी, दंतचिकित्सा आणि थायरॉईड या निदान चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ एकूण ९२ महाविद्यालयीन शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतला.

मोहिमेच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, कर्मचारी अकादमी आणि कल्याण समितीचे अध्यक्ष प्रा. के. एन. ढवळे, सदस्य प्रा. एस. एस. कांबळे, प्रा. पी.पी. शेणॉय यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी कौतुक केले.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागातर्फे डिसेंबर गुरुवारी (दि.१९) करिअर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन केले होते.



या करिअर मार्गदर्शनसाठी प्रा. स्नेहा नाईक तसेच प्रा. रेवन शिंदे तसेच मॅनेजमेंट स्टडीज विभागातील इतर सर्व प्राध्यापक यांनी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअरविषयक मार्गदर्शन केले तसेच भविष्यामध्ये वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या करिअरच्या संधी याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी मॅनेजमेंट स्टडीज शाखेतील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी यांचे कौतुक केले.

या करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन प्रा. डॉ. रीत थुले यांनी केले तसेच मॅनेजमेंट स्टडीज शाखेतील इतर सर्व प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

## अपघातात पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या अपघातात पादचाऱ्याचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्यात आली.

मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर पुणे लेनवर कि.मी ३/३०० खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत अज्ञात वाहनाने ४० ते ४५ वर्षीय इसम (नाव पत्ता माहित नाही) रस्ता पार करीत असताना ठोकर मारल्याने अपघात केला. या अपघातात पादचाऱ्याचा पायाला, छातीला, डोक्याला गंभीर दुखापती झाल्याने आयआरबी म्बुलन्सनच्या डॉक्टरांनी त्याला तपासून जागेवर मृत घोषित केले आहे. पादचारी व्यक्तीची ओळख पटलेली नसून त्याला खाजगी रुग्णवाहिकेने पनवेल उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आले.

अपघाताच्या ठिकाणी महामार्ग पोलीस, पळस्पे मोबाईल वरील स्टाफ, खांदेश्वर पो.स्टे. सहा.पो. नि. पांडुरंग घागरे व स्टाफ, आयआरबी स्टाफ व डेल्टा फोर्स स्टाफ उपस्थित होते.



## कारची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भरधाव वेगाने कार चालवून दुचाकीला दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाल्याची घटना हरिग्राम गावच्या अलीकडील पुलावर हरीग्राम येथे घडली. या अपघात प्रकरणी मारुती ब्रिजा कार (एमएच ४६ बीए ८०४९) वरील चालकाच्या विरोधात २१ डिसेंबर रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



रत्नदीप वाघपंजे (राहणार सुकापुर) आणि तांडेल हे होंडा ॲक्टिवा स्कूटी (एमएच ०६ सीआर ०६३१) वरून २० डिसेंबर रोजी रात्री सव्वा दहाच्या सुमारास डीएव्ही स्कूल, पनवेल ते वाकडी असे जात असताना हरिग्राम गावाच्या अलीकडील छोट्या पुलावर आले. या वेळी समोरून पनवेल बाजूकडे येणारी मारुती ब्रीजा मोटर कार (एमएच ४६ बीए ८०४९) या वाहनावरील चालकाने भरधाव वेगाने कार चालवली आणि ॲक्टिवा स्कूटीला ठोकर मारून अपघात केला.

या अपघातात रत्नदीप वाघपंजे आणि तांडेल यांना लहान आणि मोठ्या गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्या. त्यानंतर कारवरील ताबा सुटून चालक कारसह पुलाखाली पडला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.



**पनवेल : भाजपचे खिडूकपाडा गाव अध्यक्ष शंकुनाथ भोईर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी शौर्य भोईर, उमेश भोईर उपस्थित होते.**

## पनवेल परिसरात दोन अपघातांमध्ये एक ठार, दोघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एका ठार दोन जखमी झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाणे व पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

पनवेल जवळील जेएनपीटी-पनवेल हायवेवरील पनवेल बाजूकडे जाणार्या रोडवर मामाचा ढाब्याजवळ ज्युपिटर स्कुटीवरुन चाललेले अक्षय पारकर (वय ३०) यांनी कोणत्यातरी अज्ञात वाहनाला पाठीमागून ठोकर मारुन झालेल्या अपघातात ते स्वतः गंभीररित्या जखमी होवून त्यात ते मरण पावले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

दुसऱ्या घटनेत तालुक्यातील पनवेल मोर्बे रोडवर हरिग्राम गावाच्या अलिकडील पुलावरून मारुती ब्रिझा गाडीने होंडा ॲक्टीव्हा गाडीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात ॲक्टीव्हा गाडीवरील रत्नदीप वाघपंजे व त्यांचे सहकारी हे जखमी झाले आहेत. या अपघातानंतर मारुती ब्रिझा गाडी वरील चालकाचा ताबा सुटल्याने सदर गाडी ही पुलाखाली पडून गाडीचे नुकसान झाले आहे. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## चिरनेर गावात वृक्ष लागवड

### खासदार श्रीरंग बारणे यांचे सौजन्य

**उरण : वार्ताहर**

ऐतिहासिक व भौगोलिक वारसा लाभलेल्या उरण तालुक्यातील चिरनेर गावातील, एकविरा आईच्या जागृत स्थानाच्या इंद्रायणी डोंगराच्या पायथ्या जवळच्या परिसरात संकष्ट चतुर्थीच्या दिवशी वटवृक्षाच्या रोपट्याची लागवड करून त्यासाठी ट्री गार्ड लावण्यात आला आहे. यासाठी मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे यांचे सौजन्य लाभले असल्याची माहिती निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांनी दिली.



दरम्यान, निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल हे हुतात्म्यांना मानवंदना देणे कामी, इंद्रायणी डोंगरावर स्वखर्चाने वृक्षारोपण करणार आहेत. या कामासंदर्भात मोकल यांना जिल्हाधिकाऱ्यांनी योग्य ती मदत व सहकार्य करावे, असे आवाहन खासदार श्रीरंग बारणे यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांना लेखी पत्रातून केले आहे.

गेल्या दोन-तीन वर्षांपूर्वी चिरनेरचे सेवानिवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांनी चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांना मानवंदना देणे कामी, त्यांच्या नेतृत्वाखाली इंद्रायणी डोंगराच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. यात फळझाडांचा मोठ्या प्रमाणावर समावेश आहे.

शिवसेना उरण तालुका समन्वयक सचिन पाटील, उरण तालुका लोहार समाज अध्यक्ष कृष्णा व्यापारी, चिरनेर ग्रा. प. सदस्य दीपक कातकरी, उरण परिक्षेत्राचे वनरक्षक राजेंद्र पवार, वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेचे सदस्य करण पाटील, उरण परिक्षेत्राचे वनरक्षक संतोष इंगोले, फ्रेंड्स ऑफ नेचर संस्थेचे सदस्य हिम्मत केणी, चिरनेर ग्रा. प. माजी सदस्य नमस्ते मोकल, श्रमिक व संघटित कामगार हक्क संघटनेचे सदस्य जय कोळी, सामाजिक कार्यकर्ते श्री चांद शेख तसेच अन्य कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते. या वेळी निवृत्त जिल्हा नियोजन अधिकारी श्रीधर मोकल यांनी पर्यावरणाचे महत्त्व विषद करून सर्वांचे आभार व्यक्त केले.

## वडाळे तलाव परिसरात सामुदायिक ध्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

२१ डिसेंबर या वैश्विक ध्यान दिवसाच्या निमित्ताने पनवेल महानगरपालिका आणि श्री शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशनच्या संयुक्त पुढाकाराने, पनवेल येथील वडाले तलाव मैदानावर विशेष सामूहिक ध्यानाचे आयोजन करण्यात आले होते.





सकाळी ७ वाजल्या पासून गुलाबी थंडी आणि शांत निसर्गाच्या सानिध्यात झालेल्या कार्यक्रमात हे ध्यान करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ऋषिकेश जोशी यांनी ध्यानाबद्दलची माहिती उपस्थितांना दिली. त्यांनतर हिमालयीन ध्यानाचे प्रणेते श्री शिवकृपानंद यांच्या रेकॉर्डेड वाणीमध्ये, ध्यान मंत्राच्या उच्चाराने उपस्थितांनी ध्यानाचा आत्मीय अनुभव घेत वैश्विक ध्यान दिवस साजरा केला.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्यासह श्री शिवकृपानंद स्वामी फाऊंडेशन सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जितेंद्रशी आपला 'परिचय' असादेखील...

२००१च्या मे महिन्यातील गोष्ट. तुषार कपूरच्या रूपेरी पडद्यावरील पदार्पणातील 'मुझे कुछ कहना है'च्या पूर्वप्रसिद्धीत रंग भरला जात होता. करिना कपूरने जवळपास सर्वच गॉसिप्स मॅगझिनच्या मुखपृष्ठावर आपल्या ग्लॅमरस छबीने लक्ष वेधून घेतले होते. (ती कपूर असल्याने तिचे चित्रपटसृष्टी व मीडियाने स्वागत केले यात आश्चर्य नाही हो) तिच्या झळाळीत मुझे कुछ कहना हैचीही हवा होतीच. तरी जितेंद्र पुत्र फोकसमध्ये यायला हवा होताच. स्टार पुत्र हा एक महत्त्वाचा फंडा.


आणि अशातच जुहू विलेपार्ले स्कीममधील गुलमोहर सोसायटीतील जितेंद्रच्या कृष्णा बंगल्यावर मुंबईतील आम्हा काही निवडक सिनेपत्रकारांसाठी ओल्या पार्टीचे आयोजन करण्यात आले आणि यानिमित्त माझा जितेंद्रच्या बंगल्याशी पहिल्यांदा परिचय झाला.

पूर्वीचे अनेक कलाकार आपल्या प्रशस्त घरातील म्हणा वा बंगल्यातील म्हणा, आम्हा सिनेपत्रकारांसाठी आयोजित केलेल्या पार्टीत कधीच कंजुषी करत नसत (हात आखडता घेत नसत. म्हणूनच त्या पार्ट्या यादगार ठरल्या.) कृष्णा बंगल्यातील अगदी वरच्या मजल्यावरील या पार्टीत बबिता व करिना कपूरही छान रमल्या. (कलाकारांच्या घर वा बंगल्यातील आम्हा मिडियासाठीच्या पार्ट्या हा एक आठवणीत झक्कास ओला विषय)

जितेंद्र मुळचा आमचा गिरगावकर. मराठीत बोलणारा/ऐकणारा. या पार्टीचा तो यजमान. त्यामुळे तो आम्हा सिनेपत्रकारांशी छान गप्पांत रमला. चित्रपती व्ही.शांताराम यांच्या राजकमल कलामंदिर स्टुडिओत तो कार्यरत असल्यापासूनच्या काही आठवणी त्याने सांगितल्या. व्ही.शांताराम यांचा त्याने अतिशय आदराने अण्णा असा केला. याच गप्पांत त्याची वेगळी भूमिका असलेला चित्रपट कोणता? असे मी विचारता, तो पटकन म्हणाला, परिचय...

या चित्रपटाच्या मुंबईतील प्रदर्शनास बावन्न वर्ष पूर्ण झाली. यानिमित्त मला हा क्षण आठवला. (१ डिसेंबर १९७२ रोजी मुंबईतील लिबर्टी चित्रपटगृह व इतरत्र तो प्रदर्शित झाला. गुगलवरील २० ऑक्टोबर १९७२ ही तारीख परिचय सेन्सॉर संमत झाल्याची आहे.)


'फर्ज'च्या यशाने जितेंद्र स्टार झाला आणि त्याला मसालेदार मनोरंजक चित्रपटातून भूमिका मिळाल्या. त्यात काय करायचे होते? नायिकेवर प्रेम प्रेम प्रेम (त्या काळात एकाच प्रेम गीताचा कोटा पुरेसा ठरत नसे..कधी एकादे विरह गीतही), त्यात नृत्याच्या नावाने शक्य तेवढी नायिकेशी जवळीक, धक्के वा घसट, आईशी ममतेचे नाते (आईने बनवलेला गाजर का हलवा तर जवळपास सर्वच चित्रपटात), कॉमेडीसोबत मौज मजा आणि क्लायमॅक्सला व्हीलनची पिटाई (पुष्पा २ एन्जॉय करताना पन्नास वर्षांपूर्वीच्या हिंदी चित्रपटातील ढिश्यूम ढिश्यूम अगदीच अळणी नि बेचव हो. असो.) हे करत करत राहिल्याने पिक्चरची



संख्या वाढत राहील, पण दर्जेदार अभिनेता असा आपला परिचय  नाही हो होणार.


हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि जितेंद्र केवळ जम्पिंग जॅक हिरो नाही, त्याला अभिनयही येतो यावर चित्रपटसृष्टी, चित्रपट रसिक आणि त्या काळातील मुद्रित माध्यमे यांनी पहिल्यांदाच विश्वास ठेवला. ती एक प्रकारची मिळकत. अशा प्रकाराचा आपल्याबाबतचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होणे ही तेव्हा जितेंद्रची एक व्यावसायिक गरजही होती, म्हटलंत तर 'खेळी'ही होती. या चित्रपटाला चक्क बावन्न वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त हा फोकस.

जितेंद्रच्या प्रगती पुस्तकातील सुरुवातीचे गुण हिट गाण्यांचे. या गाण्यांचा रेडिओ, लाऊडस्पीकर ते यू ट्यूब असा यशस्वी प्रवास सुरूच आहे. रवी नगाईच दिग्दर्शित 'फर्ज 'मधील मस्त बहारोंका आशिक मै जो चाहू प्यार करू, बार बार दिन ये आऐं, रामन्ना दिग्दर्शित 'हमजोली'मधील हाय रे हाय नींद नही जाय, ढल गया दिन हो गयी श्याम, नासिर हुसेन दिग्दर्शित 'कारवा'मधील चढती जवानी मेरी चाल मस्तानी, कितना प्यारा वादा है, गोरियां कहा तेरा देश रे, रामन्ना दिग्दर्शित 'वारीस'मधील लहरा के आया है, एक बेचारा प्यार का मारा, कभी कभी ऐसा भी तो, रविकांत नगाईच दिग्दर्शित 'हिम्मत'मधील शुकर के तू है लडका, मान जाईऐ मान जाईऐ अशा अनेक सुपर हिट गाण्यांतील जितेंद्रचे धसमुसळे नाचणे, कंबर हलवणे, नायिकांना धक्के देणे यामुळेच त्याची 'उछलकूद हिरो' अशी इमेज झाली, पब्लिकला ती भारी आवडली आणि अशा डान्सर हीरोला प्रतिष्ठा मिळत नाही. (काय एकेक अलिखित नियम. चित्रपटसृष्टीत अशाच अनेक रंगांची रेलचेल) तो सवंग एन्टरटेनर म्हणून दुर्दैवाने ओळखला जातो. तशा मसालेदार



मनोरंजक चित्रपटातून भूमिका करतानाही कस लागतोच हो. आपला चित्रपट गीत संगीत व नृत्य यामुळेच जगापेक्षा अगदी वेगळाच असल्याने ते रूपेरी पडद्यावर साकारणारा हीरो महत्त्वाचा असतो. (जुन्या व्याख्या बदला हो. आपलाही चित्रपट खूप पुढे गेला आहे.) तुलनेत अभिनेत्रींच्या रूपेरी नृत्याला सकारात्मक दाद अशीच दीर्घकालीन परंपरा. वैजयंतीमालापासून माधुरी दीक्षितपर्यंत नावे घ्यावीत तेवढी थोडीच. शास्त्रीय नृत्यापासून आयटेम साँगपर्यंतचा हा प्रवास.

तात्पर्य, जितेंद्रला 'नाचो हिरो' या प्रतिमेतून बाहेर यायचंय आणि त्यासाठी त्याचा भाऊ प्रसन्न कपूर यानेच तिरुपती पिक्चर्स या बॅनरखाली चित्रपट निर्मिती करायचे ठरवले. दिग्दर्शक म्हणून गुलजार हेच योग्य नाव होते. ते दिवस राजेश खन्नाच्या क्रेझने व्यापलेले होते. एक प्रकारचा तो हिस्टेरियाच होता. जितेंद्रलाही याचा फटका बसला होताच. अशा वातावरणात गुलजार दिग्दर्शित 'परिचय' उत्तम संधी. राजकुमार मैत्रा यांच्या 'कारंजी उतरैन' या बंगाली कादंबरीवर आधारित गुलजार आणि डी. एन. मुखर्जी यांनी पटकथा लिहिली. साहित्यावर आधारित चित्रपट हेदेखील त्या काळातील वैशिष्ट्य (आजही ते अधूनमधून पडद्यावर दिसते. ढाई आखर हे ताजे उदाहरण) गुलजार यांचेच साहित्यिक संवाद. चित्रपटात जितेंद्र, जया भादुरी, प्राण, असरानी, गीता सिद्धार्थ, वीणा, लीला मिश्रा, पेंटल, केश्तो मुखर्जी तसेच विशेष भूमिकेत संजीवकुमार आणि पाहुणा कलाकार विनोद खन्ना. तर गुलजार यांच्या



गीताना राहुल देव बर्मनचे संगीत. जे आजही लोकप्रिय आहे.

तो काळ अनेक बाबतीत वेगळाच. घोषणेपासूनच छोट्या छोट्या  बातम्यांतून चित्रपट रसिकांसमोर राही आणि मग चित्रपट पूर्ण होत असतानाच त्याची तबकडी प्रकाशित होई. रेकॉर्ड विक्रीच्या दुकानातील बाहेरच्या शो केसमध्ये तबकडीचे कव्हर पाहण्यातही आनंद मिळे. गुलजार यांच्या गीताना आर.डी. बर्मनचे संगीत म्हणजे, कधी एकदा ही नवीन गाणी ऐकतोय असे होणारे. मुसाफिर हू यारो (पार्श्वगायक किशोरकुमार), बीती ना बीताई रैना (लता मंगेशकर व भूपिंदर सिंग), मिठे बोल बोले (भूपिंदर सिंग), सा रे सा रे (आशा भोसले आणि किशोरकुमार) ही गाणी लोकप्रिय झाली. बिनाका गीतमालामध्ये मुसाफिर हू यारों... बऱ्याच वरच्या क्रमांकावर आलेदेखील. जितेंद्रचे वेगळे रूप हे 'परिचय'चे विशेष आकर्षण आणि उत्सुकता. प्रेक्षकांपर्यंत चित्रपट असा विविध माध्यमातून पोहचतो. हा प्रवासही महत्त्वाचा.

'परिचय'ची थीम अगदी थोडक्यात सांगायलाच हवी. आर्मीतील निवृत्त अधिकारी राजसाहेब (प्राण) याना आपल्या रमा (जया भादुरी आणि मास्टर राजू वगैरे) आणि इतर नातवंडांसाठी चांगला शिक्षक हवा आहे, कारण जो जो शिक्षक येतो त्याला ही नातवंडे सळो की पळो करून सोडतात. अखेर रवी (जितेंद्र) येतो. या शिक्षकालाही तोच अनुभव येतो, पण तो हळूहळू आपल्या संयमित व खेळकर वागण्यातून सगळ्याना आपलेसे करतो. राज साहेब यांचा मुलगा नीलेश (संजीवकुमार) हा संगीतात विशेष रस घेणारा असतो.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

त्याच्या आणि त्याची पत्नी सुजाता (गीता सिद्धार्थ) यांच्या निधनानंतर त्यांच्या मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी राज साहेबवर असते. चित्रपटात आणखी काही छोट्या छोट्या गोष्टी आहेतच. संकलन वामन गुरू यांचे आहे. या



चित्रपटाची मूळे 'साऊंड ऑफ म्युझिक' या विदेशी चित्रपटात सापडतात असे म्हटले गेले असले तरी त्याचे आपल्याकडील चित्रपटातील सादरीकरण उत्तम जमलंय हे महत्त्वाचे. आपल्या देशातील चित्रपटाचे वैशिष्ट्य जमणे आवश्यक असतेच.

...'परिचय' प्रदर्शित झाला आणि रसिकांनी त्याला आपलासा केला. चित्रपटाच्या स्वरूपानुसार त्याचे मुंबईतील मेन थिएटर लिबर्टी अगदी परफेक्ट. नवीन रुपातील जितेंद्र रसिकांना आपलासा वाटला. जयाचे रूपडं तसे परिचित, पण जितेंद्र अगदी संयमित आणि सरळ वृत्तीचा होता. त्याने गुलजारजींना भरपूर सहकार्य दिल्याचे पडद्यावर उतरले. चित्रपटाच्या यशाने जितेंद्रची गाडी पुन्हा रूळावर आली आणि एका बाजूस कौटुंबिक मनोरंजक चित्रपटातून भूमिका साकारत असतानाच दुसरीकडे गुलजार दिग्दर्शित 'खुशबू' (१९७५), 'किनारा' (१९७७) अशा कथाप्रधान चित्रपटांतूनही त्याने भूमिका साकारत आपली वाटचाल यशस्वीपणे पुढे सुरू ठेवली. तेच तर महत्त्वाचे असते. त्यासाठी जितेंद्रसाठी टर्निंग पॉईंट ठरला, गुलजार दिग्दर्शित 'परिचय'. जितेंद्रचा नवा परिचय करून देणारा चित्रपट.

जितेंद्र म्हटलं की जम्पिंग जॅक, आदर्श फिटनेस फंडा, पक्का व्यावसायिक, उत्तम कारकीर्द व्यवस्थापक, आपल्या मर्यादा ओळखून काम करणारा कलाकार, नायिकांच्या बदलत्या पिढीसोबत छान जुळवून घेणारा अभिनेता हे तर सगळेच आहे, उगाच का तो यशस्वी ठरला. उगाच नाही हो तो आपलीही ओळख निर्माण करु शकला? त्याचा भाऊ प्रसन्न कपूर चित्रपट निर्माता झाला, त्याचा मेव्हणा रमेश सिप्पी चित्रपट वितरक होते (शोले प्रसिद्ध रमेश सिप्पी वेगळा. हे केवळ नामसाम्य. फिल्मी दुनियेत एकाच नावाचे दोघे हादेखील रंजक विषय). त्याचे गिरगावातील प्रसाद चेंबर्स या भव्य इमारतीत बी.आर.ए. एन्टरप्राईजेस लिमिटेड असे चित्रपट वितरण कार्यालय होते आणि जितेंद्रची भूमिका असलेले अनेक चित्रपट याच चित्रपट वितरण संस्थेकडून प्रदर्शित होत. जितेंद्रसाठी ही अतिशय उत्तम व व्यावसायिक अशी सपोर्ट सिस्टीमच होती.


एखाद्या व्यवसायात मुरायचे म्हणजे अशी अनेक स्तरावर आपली बाजू बळकट करावीच लागते. एखाद्या कलाकाराचे किती चित्रपट सुपर हिट व किती अपयशी ठरले या गणिती प्राणायामापलिकडे जाऊन बरेच काही असतेच. जितेंद्र त्यासाठी उत्तम केस स्टडी (अथवा अभ्यासासाठी उत्तम मॉडेल). त्यासह त्याच्या प्रगती पुस्तकात त्याचा गुलजार नमस्कार परिचयमधील अभिनय (कोणी म्हणतात त्याने त्यात अभिनयाचा प्रयत्न केला.) जितेंद्रशी आपला  परिचय बहुस्तरीय आहे हेच केवढे तरी महत्त्वाचे.

# लावणीसम्राट पठ्ठे बापूराव

महाराष्ट्राच्या मातीला जसा इतिहासाचा वारसा आहे, तशी सांस्कृतिक परंपराही आहे. सांस्कृतिक परंपरेतील महाराष्ट्राची एक प्रमुख ओळख म्हणजे लावणी. अखिल भारतात जसा पंजाबचा भांगडा, गुजरातचा गरबा, दक्षिणेचा कथ्थक प्रसिद्ध आहे तशी महाराष्ट्राची लावणीही प्रसिद्ध आहे. महाराष्ट्राच्या लावणीने आज सातासमुद्रापार नाव कोरलंय. अनेक कलाकार,संगीतकार यासाठी अतोनात मेहनत घेत असतात, पण लावणीने जे यश मिळवला आहे त्याच सर्वस्वी श्रेय कोणाच असेल तर ते पठ्ठे बापूराव यांचं. त्यांची आज पुण्यतिथी.

पठ्ठे बापूराव अर्थात श्रीधर कृष्णाजी कुलकर्णी हे मुळचे सांगलीतील वाळवा तालुक्यातील रेठरे हरणाक्ष गावचे. त्यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८६६ रोजी झाला. त्यांचे वडील कृष्णाजी यांच्याकडे या गाव व परिसराचे कुळकर्णीपद होते. त्यांनी तसेच संस्कार आपला मुलगा श्रीधरला दिले, पण श्रीधरला यात म्हणावा तसा उत्साह नव्हता. म्हणूनच कृष्णाजींनी औंध संस्थानाचे महाराज पंतप्रतिनिधी यांच्या आश्रयाखाली श्रीधरला पाचवीपर्यंतचे शिक्षण दिले. यातच मिळेल त्या वेळेत मित्रांसोबत भटकणे, कवने करणे याचा छंद लहानग्या श्रीधरला जडला. घरच्यांनी प्रथमदर्शनी याला विरोध केला खरा, पण तो होताच पठ्ठा, ऐकणार कसला!

सर्व छंद म्हणून ठीक आहेत, पण यातून उदरनिर्वाह चालत नाही असे घरच्यांनी सुनावल्यानंतर ते गावातील एका तमाशा फडासोबत मिळून काम करू लागले. गावोगाव प्रवास करू लागले. श्रीधररावांच्या लेखणीतून येणाऱ्या लावण्या प्रचंड लोकप्रिय ठरू लागल्या. आधी केवळ वग, गौळणी आणि लावण्याच तमाशात सदर केल्या जायच्या, पण लावण्यांबरोबर असेही काही असावे ज्यातून लोकांचे मनोरंजन तर होईलच शिवाय लोकांची उपस्थितीही वाढेल. मग पठ्ठे बापुरावानी यात भेदिक लावण्या, संवाद, पदे, झगड्याच्या लावण्या असे प्रयोग करत यात लिखाण केले. लोकांनीही याला भरभरून प्रतिसाद दिला.



लावणीचं अस्तित्व पहिल्यापासून टिकून होते पण तिला नावरूप मिळवून देण्यासाठी पठ्ठे बापुरावांनी अथक परिश्रम घेतले. गावातील तमाशाच्या फडाबरोबर इतरही तमाशाचे लोक पठ्ठे बापुरावाकडे काम घेऊन येऊ लागले. प्रत्येक तमाशात, लावणीतील वगात पठ्ठे बापूरावांचे शब्द नाचू लागले. यातूनच ते सबंध महाराष्ट्रात सर्वोत्मुख झाले. त्यांची लोकप्रियता व आवड एवढी वृद्धिंगत झाली की काही काळानंतर त्यांनी व्यवसाय व संसार सोडून स्वतःचा तमाशा फड सुरू केला. पठ्ठे बापूरावांचा फड आलाय हे ऐकताच लोकांची झुंबड उडू लागली. या फडात पठ्ठे बापुराव त्यांनी लिहिलेल्या लावण्या सादर करण्याबरोबरच गावूही लागले.

लोकांचा प्रतिसाद वाढतच राहिला, श्रीधर कृष्णाजी कुलकर्णी आता शाहीर पठ्ठे बापूराव म्हणून सर्वश्रुत झाले होते. गण, गौळण, भेदिक, झाग्द्या, राणी, रंगबाजी अशा अनेक प्रकारच्या लावण्या त्यांनी स्वतः लिहिल्या. त्यांनी हयातीत दोन लाखांहून अधिक लोक लावण्या व वग लिहिले असे अनेक लेखक सांगतात, पण याचा नेमका आकडा मात्र अजून तरी उपलब्ध नाहीये. त्यांच्या काहीच रचना आज संग्रहात आढळतात.

पठ्ठे बापूराव यांच्या लावण्या व पठ्ठे बापूराव यांच्या ढोलकीवरील लावण्या असे दोन प्रकारचे पुस्तकही आज बाजारात उपलब्ध आहेत. त्यांनी रचलेला मिठाराणीचा वग तर महाराष्ट्राने डोक्यावरच घेतला होता. थोडीफार बेपर्वाई असली तरी प्रसंगावधान राखून त्यांच्या लावण्या समर्पक असतात असे त्या काळातील साहित्यिक सांगत.

तमाशात होणारे संवाद, लोकांची मानसिकता यावरही पठ्ठे बापुरावांनी आपल्या लेखणीतून भाष्य केले, लोकही याला सहज स्वीकारू लागले. पठ्ठे बापूराव हे मुळातच हजरजबाबी होते, दिसणाऱ्या व घडणाऱ्या प्रत्येक बाबीवर ते तत्काळ काही ना काही मत व्यक्त करत. त्यांचं लिखाण हे एवढ बोलकं असायचं की  न.चि. केळकरांनी त्यांना शीघ्रकवी हा सन्मानाच बहाल केला. पुढे पठ्ठे बापूराव लावणी भाग १, भाग २,भाग ३ असे काही संग्रह प्रसिद्ध झाले आणि विशेष म्हणजे याला न.चि. केळकरांनी स्वतः प्रास्ताविक दिले.

पठ्ठे बापुरावांनी लिहिलेली चौदा रत्नांचा जन्म व तीन वस्तूची भेदिक लावणी ज्यावेळी आपण वाचतो त्यावेळी पठ्ठे बापूराव ही व्यक्ती किती कल्पक होती याचा प्रत्यय आपल्याला येतो. महाराष्ट्राच्याच काय तर देशाच्या सीमा पार करत आज लावणी जगात गाजत आहे. लावणीमुळे महाराष्ट्राचा सन्मान वाढतोय, सांस्कृतिक परंपरा जपली जातेय.

सांगलीसारख्या जिल्ह्यातून येऊन पठ्ठे बापुरावांनी लावणीला एक नव संजीवनी देत तिला लोकप्रिय केले, छोट्याशा हरणाक्ष गावच्या कुलकर्ण्यांचा मुलगा महाराष्ट्राचा एकमेव लावणी सम्राट बनला. एक छंद म्हणून सुरू केलेल्या लावणीने पठ्ठे बापुरावाना अजरामर केले. साहित्य कला यांचा अभ्यास करणाऱ्या व त्यात सहभागी असणाऱ्या अनेकांसाठी पठ्ठे बापूरावांचे लिखाण नक्कीच कमी येते. महाराष्ट्रात तर लावणीवरील अभ्यासक्रमही विद्यापीठातून चालवला जातो. अशा या महान लावणी सम्राटाचे २२ डिसेंबर १९४५ रोजी निधन झाले. पठ्ठे बापुरावांनी दिलेल्या योगदानास आमचा सलाम!

(साभार : द पोस्टमन टीम)




# गरीबी ते ग्रॅमी अनुभवलेला कलाकार

कलासृष्टीमध्ये काम करत असताना काही गोष्टी मनाला इतक्या हळव्या करून जातात. त्यातील एक दुःखद घटना म्हणजे उस्ताद झाकीरजीचं जाणं. पं. रविशंकरजींनंतर भारतीय संगीत पाश्चात्य देशात पोहोचवणारे एकमेवद्वितीय असे कलाकार झाकीरजी होते.

प्रतिभावान कलाकार असतानासुद्धा जमिनीवर पाय ठेवून आपली कला वृद्धिंगत होऊ देणे हे उस्तादजींकडून खूप शिकण्यासारखं होतं. ते शेवटपर्यंत म्हणायचे की, अभी तो हम सिख रहे है. अनेकदा त्यांचा तबला सोलो अगदी जवळून पाहण्याचा योग आला. एक फोटोग्राफर म्हणून त्यांच्या प्रतिमा संग्रहित करता आल्या. जवळजवळ २५-३० कार्यक्रमांमध्ये त्यांचे फोटो काढले. प्रत्येक वेळी फोटो काढताना झाकीरजींच्या चेहऱ्यावरची प्रसन्न मुद्रा असायची, ती फार विलोभित करून टाकायची. त्यांच्याजवळ गेलो, त्यांना नमस्कार केला की अगदी माता सरस्वतीला वंदन करतोय अशी भावना मनात यायची.

आमची पिढी याबाबतीत खूप भाग्यवान असेल की आम्ही झाकीरजींना पाहिलं, ऐकलं, त्यांच्यासोबतच्या अनेक आठवणी आम्ही जमवून ठेवल्या. त्यांचा शेवटचा सोलो १२ ऑगस्टला अब्बाजींच्या गुरूपौर्णिमेमध्ये ऐकला. हाच त्यांचा भारतातील शेवटचा कार्यक्रम. उस्तादजी नेहमी स्वतःचा तबला स्वतः स्टेजवर घेऊन यायचे. स्टेजवर आल्यावर खचाखच भरलेलं सभागृह एका क्षणात उभं राहायचं.. टाळ्यांचा जल्लोष.. झाकीरभाईंच्या प्रत्येक समेवर मिळालेली दाद.. अशी सम परत होणे नाही.





६ डिसेंबरला त्यांचा ठाण्यात तबला सोलो होणार होता. खूप आतुर होतो या कार्यक्रमासाठी, परंतु देवाच्या मनात फार वेगळंच होतं. आज आमच्या 'कलाविश्वाचा देव' आमच्यातून निघून गेला असं म्हणू शकतो.

उस्तादजींकडून एकेक गोष्ट घेण्यासारखी होती. त्यांचं कलेप्रती असलेले प्रेम, बुद्धीचातुर्य, प्रामाणिकपणा, रसिकांबद्दल असलेला आदर इत्यादी गुण वाखाणण्याजोगे होते. एक कलाकार आणि त्यासोबतच एक माणूस म्हणून झाकीरजी ज्येष्ठ आणि श्रेष्ठ होते. अनेक वर्ष अमेरिकेत राहूनसुद्धा त्यांनी नागरिकत्व भारताचं ठेवलं होतं. पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, ग्रॅमी अवॉर्ड असे अनेक नामांकित पुरस्कार त्यांना आजपर्यंत मिळाले. त्यांच्या जाण्याने हिंदुस्तानी संगीत खऱ्या अर्थाने पोरकं झालं.

७३ वर्षाच्या आयुष्यात झाकीरजींनी सुरुवातीला गरिबीपण अनुभवली आणि संगीतातला सगळ्यात मोठा पुरस्कार ग्रॅमीपण अनुभवला. खऱ्या अर्थाने उस्तादजी आपलं आयुष्य कलेसाठी जगले आणि कलेप्रती आपलं आयुष्य समर्पित केलं.. 'झाले बहु होतील परी या सम हा'...!

-मयूर कुलकर्णी
संगीत समीक्षक,
मुंबई

## निवडक

### बंदुकीच्या गोळ्या झाडण्याची धमकी

**नेरळ :** बंदुकीचा धाक दाखवत तरुणाला गोळ्या झाडण्याची धमकी देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार कर्जत तालुक्यात घडला. कळंब साळोख गावाजवळील नारळाचीवाडी येथे हा प्रकार घडला असून साळोख येथील राहणारा शोएब शाबिर बुबरे या तरुणाने कॉन्ट्रॅक्टर संजू जगदीश मोहिते या तरुणास धमकावले आहे. टॉवरच्या बांधकामात पैसे मागून खंडणी गोळा करण्याचा प्रकार असल्याचे समोर आले आहे. शोएब बुबेरे याने एका हातात लोखंडी रॉड तर दुसऱ्या हातात बंदूक धरून थेट कॉन्ट्रॅक्टर तरुणाच्या छातीवर बंदूक रोखल्याने त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला, मात्र याघटनेने कर्जत तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, घटनेचा तपास नेरळ पोलीस ठाण्याचे पोलिस अधिकारी शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप फड हे करीत आहेत.

### मोरे महाविद्यालयात प्रशिक्षण सत्र

**रोहे :** एम.बी. मोरे फाउंडेशनचे कला, वाणिज्य आणि सायन्स महिला महाविद्यालय, धाटाव, रोहा येथे मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाकडून रायगड जिल्हास्तरीय महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यासाठी द्वितीय सत्र प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुख्य मार्गदर्शक डॉ. कुणाल जाधव, समन्वयक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी उपस्थित प्राध्यापकांना द्वितीय सत्रातील प्रकल्प कार्य आणि उडान महोत्सव याबाबत मार्गदर्शन केले. रायगड जिल्ह्यातील विभागीय समन्वयक डॉ. दत्ता कुंटेवाड आणि डॉ. जयशंकर पांडे यांनी उपस्थितांचे शंकानिरसन केले.

### संत गाडगेबाबांची पुण्यतिथी



**मुरूड :** स्वच्छतेविषयी जनजागृती करणारे व कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा दूर करणारे महान संत गाडगेबाबा महाराज यांची पुण्यतिथी शुक्रवारी (दि. २०) नांदगाव हायस्कूल येथे साजरी करण्यात आली. या वेळी मुख्याध्यापिका अर्चना खोत यांच्या हस्ते गाडगे महाराज यांच्या तसबिरीला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, महेश वाडकर, राहील घलटे, महादू अहिरे, निशा बिरवाडकर, जयश्री घाडगे, नियती ठमके, रवींद्र भोई, दत्ता खुळपे, सागर राऊत, भारत चव्हाण, मंगेश नांदगावकर आदी शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# मुरूडकरांना पर्यटन महोत्सवाची प्रतीक्षा

## ◆ बीचवरचे हॉटेल व्यावसायिक चिंतेत

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

मुरूडच्या विशाल सुंदर समुद्रकिनारी गेली २० वर्ष पर्यटन महोत्सव भावण्यात येतो. अनेकवर्ष याचे नियोजन नगरपालिका करते. सद्य पालीकेत नगरसेवक नसल्याने व मुख्याधिकारी नवीन आल्याने ह्यावर्षी पर्यटन महोत्सव २०२४ होणार की नाही याची निश्चिती नसल्याने मुरूडच्या हॉटेल व्यावसायिक चिंतेत आहे.

पर्यटन महोत्सव ही मुरूडची शान आहे. दरवर्षी समुद्रात वाळूत ६० फुटी स्टेज बांधून सुंदर अशा लाटांच्या आवाजात सायंकाळच्या सप्तरंगी प्रकाशात या महोत्सवची सुरवात होते २५ डिसेंबर १ जानेवारी असा रोज विविध कार्यक्रम असल्याने महाराष्ट्रातून पर्यटक खास ह्यादिवसात मुरूडला येतात, पण ह्यावर्षी पर्यटक महोत्सव नसल्याने ॲडव्हान्स बोकिंग झाली नाही, असे हॉटेल वैवसायिक सांगत आहेत.



गेल्यावर्षी आमदार महेंद्र दळवी यांनी स्वखर्चाने पर्यटन महोत्सवाचे नियोजन केले होते. शिवसेनेचे शहर प्रमुख संदीप पाटील आणि सहकार्यांनी अतिशय सुंदर नियोजन महोत्सवाचे केले होते ह्यावर्षी आमदार नागपूरला अधिवेशनात व्यस्त असल्याने महोत्सवाबाबत निर्णय होऊ शकला नाही. आमदार मुरूडला येतच तातडीने निर्णय घेऊन महोत्सव करण्याचा मानस असलयाचे संदीप पाटील यांनी सांगितले.


मुरूडला समुद्राच्या लाटांचा आनंद व शिवरायांचे जलदुर्ग पाहण्यासाठी खास येतो. समुद्रकिनारी असणारे हॉटेल व्यावसायिकांनी चंगली सेवा देऊन पर्यटकांना खुश केले. पर्यटकांची सगळ्यात आवडती गोस्ट म्हणजे ताजी मासळी पापलेट, सुरमई, रावस, जिताडा, कोळंबी, नाताळ सुटीत खूप ताव मारणार व वर्ष भर पुरेल एवढे ताजे कोळंबीचे सोडे मोठ्या प्रमाणात तयार आहेत. मुरूड व राजपुरी येथील सोडे प्रसिद्ध आहेत. कोणताही वईस वास न येणारे सोडे फक्त मुरूडला मिळतात. मुरूड समुद्रकिनारी सुशिभिकरण झाल्याने उत्तम पार्किंगची सोया झाली हंगामात ४०० पर्यटकांची वाहने समुद्रकिनारी पार्कींग झाल्याने पर्यटक पर्यटनचा खरा आनंद घेऊ शकले

सुक्या मासळीला मागणी वाढली आहे. ऑक्टोबरच्या काकडक उन्हात सुरमई, हलवा, बोंबील, अंबाडी सुकट, पांढरी सुकट कोळी महिलांनी मोठ्या प्रेमात सुकवली व दिवाळीसाठी साठवली. पर्यटकांची चांगली साथ मिळाल्याने साठवलेला सगळं माल संपला. कोळी महिलांना मासळी सुकवण्यासाठी सुरक्षित जागा नसल्याने सुक्या मासळीचे उत्पादन बनवण्यावर बंधन आहे. कोळी महिलांची अनेक वर्षांची मागणी आहे की, मासळी सुकवण्यासाठी समुद्रकिनारी कॉक्रीटचे ग्राउंड पाहिजे. जेणेकरून सुकलेल्या मासळीला स्वच करणे सोपे जाते व मासळीचा दर्जा उत्तम होतो.

अशा सर्व आवडीच्या गोष्टी आनंद घेण्यासाठी येणार पर्यटक महोत्सवानिमित्ये येतो म्हणून ह्यावर्षी महोत्सवाचे नियोजन होणे गरजेचे आहे.

# खालापूर शहरातील जलवाहिनीला गळती

**हजारो लिटर पाणी वाया**



**खोपोली : प्रतिनिधी**

हंडाभर पाण्यासाठी जीवाचे रान करावे लागणाऱ्या खालापूर शहरात जलवाहिनीला लागलेल्या गळतीमुळे नागरिकांच्या वाट्याचे हजार लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात आहे.

शहरात दैनंदिन वापरासाठी पाणी दोन दिवसाआड तर कधी त्यापेक्षा जास्त दिवसांनी मिळते. कधी मुख्य जलवाहिनीत बिघाड तर कधी पाताळगंगा नदीला पाण्याची पातळी कमी असल्याने खालापूर शहराच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होतो. शहरातील सोळा पेक्षा विविध भागात टप्प्याटप्प्याने पाणी सोडले जाते. पाणी सोडण्याची वेळ निश्चित असल्याने कोणत्या वेळी आलेले पाणी नागरिकांसाठी अमृता सारखे असते, परंतु याची जाणीव नगरपंचायत प्रशासनाला नसल्याची विदारक स्थिती पहावयास मिळत आहे. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच कालकाई मंदीर रस्ता परिसरात जलवाहिनीला मोठ्या प्रमाणात गळती लागलेली आहे. त्यामुळे हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जाते.

काही महिन्यापूर्वी या जलवाहिनीची दुरुस्ती करण्यात आली होती, परंतु त्यानंतर पुन्हा गळती लागून प्रचंड पाणी रस्त्यावर वाहून जात असल्याने नागरिकांना पाण्यासाठी कसरत करावी लागत आहे. जलवाहिनीची योग्य प्रकारे दुरुस्ती करण्याची मागणी, नागरिक करत आहेत.

**“ रहदारीच्या मार्गावर नेहमी मोठ्या प्रमाणात पाण्याची तळे साचलेले असते. शहरात पाणीटंचाई असताना एवढ्या प्रचंड प्रमाणात पाण्याची नासाडी याकडे नगरपंचायतने लक्ष द्यावे. पाणी जमा झाल्याने रस्ता देखील प्रचंड खराब झाला आहे.**

**-नवीनचंद्र घाटवळ, खालापूर**

**जलवाहिनी दुरुस्तीबाबत योग्य ते लक्ष देण्यात येईल. जुने जीर्ण पाईप काढून त्या ठिकाणी नवीन पाईप बसविण्याच्या सूचना केल्या आहेत.**

**-रोशना मोडवे, नगराध्यक्ष, खालापूर नगरपंचायत**

# बेलोशी गावात वनराई बंधारे



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील बेलोशी गावांमध्ये कृषी विभागातर्फे श्रमदानातून नुकतेच वनराई वळण बंधारे बांधण्यात आले.

अलिबाग तालुका कृषी अधिकारी तन्मय भगत, नागाव मंडळ कृषी अधिकारी मोहनजी सूर्यवंशी, चौल विभाग कृषी पर्यवेक्षक श्रीमती जमादार, बेलोशी विभाग कृषी सहाय्यक अधिकारी मिसाळ, थळ विभाग कृषी सेवक टकले, रामराज विभाग कृषी सेवक बोऱ्हाडे यांनी बेलोशीतील शेतकऱ्यांना सोबत श्रमदानाने केले.

भाजपा दक्षिण रायगड जिल्हा ओबीसी सरचिटणीस अशोक वारगे, बेलोशी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सदानंद थळेसर, ग्रामपंचायत सदस्य सुशील पाटील, शेतकरी जयवंत वारगे, समीर वारगे, मंगेश नाईक आदी या वेळी उपस्थित होते.

# माणगाव तालुक्यात शासकीय नोकरभरती व अभ्यासिका व्हावी

## भाजपच्या निलेश थोरे यांची मागणी



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगांव शहरामध्ये पदव्युत्तर व स्पर्धा परीक्षा/शासकीय नोकरभरती करीता सुसज्ञ अभ्यासिका केंद्र व्हावे अशी मागणी भाजपचे युवक जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांनी कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या पत्नी नीलिमाताई डावखरे यांच्याकडे केली असून यावर लवकरात लवकर माणगांवकरांचे व नजीकच्या श्रीवर्धन, म्हसळा,तळा तालुक्यातील पदवीधरांचे कित्येक वर्षांचे स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे सौ.डावखरे यांनी सांगितले.

आमदार निरंजनजी डावखरे हे सलग तिसऱ्यांदा या मतदार संघातून प्रचंड बहुमतांनी निवडून आले असून लोकसभा झाल्यानंतर तातडीनेच त्यांनी मतदार संघात असणारे भाजप महायुतीचे कार्यकर्ते, पदवीधर मतदार, शिक्षक संघटना व समविचारी संस्था संघटना यांना संपर्क करून मतदारसंघातील प्रत्येक विधानसभानिहाय दौऱ्याला सुरुवात केली आहे त्याच निमित्ताने त्या माणगांव येथील वनवासी कल्याण आश्रमशाळा येथे आलेल्या असताना झालेल्या बैठकीमध्ये भाजपाचे युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष युवा नेते निलेश थोरे यांनी सांगितले की, माणगांव तालुका हा भविष्यातील रायगड जिल्ह्याचे ठिकाण होणार असून माणगांव शहरामध्ये सद्यस्थितीला लॉ कॉलेज,BSc Chem, BSc IT, Bsc Nursing, CBSC School, ITI अश्या प्रकारचे विविध विषयांवर पदवी घेण्यासाठी विद्यालये असून तालुक्यातील लोणेरे या गावी डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ असून तेथे दरवर्षी शेकडो विद्यार्थी अभियांत्रिकी पदवी घेत असतात.

या सगळ्याच विद्यार्थ्यांनी भविष्यात विविध क्षेत्रांमध्ये ज्ञान मिळवावे व MPSC, UPSC, IRS अश्या अनेक स्पर्धा परीक्षा, शासकीय, बँकिंग परीक्षा उत्तीर्ण व्हाव्यात याकरीता मध्यवर्ती ठिकाण म्हणून माणगांव शहरामध्ये सुसज्ञ अभ्यासिका व्हावी जेणेकरून भागातील सर्व विद्यार्थ्यांना त्याचा लाभ घेता येईल. यावर बोलताना नीलिमा डावखरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत सदरच्या अभ्यासिका केंद्र उभारण्यासाठी थेट केंदशासनाच्या पातळीवरूनही आपण प्रयत्न करू आणि लवकरात लवकर सदरच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील राहू असे सांगितले.

दरम्यान, अश्या प्रकारची अभ्यासिका व स्पर्धा परीक्षा केंद्र झाले तर माणगांव व परिसरातील श्रीवर्धन, म्हसळा, तळा,रोहा, महाड या तालुक्यानाही याचा थेट लाभ होणार असून आपल्या भागातूनही अनेक अधिकारी घडतील, असा विश्वासदेखील या वेळी व्यक्त करण्यात आला.

प्रसंगी जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, माणगाव तालुका अध्यक्ष गोविंद कासार, श्रीवर्धन तालुका अध्यक्ष आशुतोष पाटील, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष प्रणय पेडणेकर, सरचिटणीस जहेंद्र मुंढे, बाबुराव चव्हाण, शिक्षक परिषदेचे पदाधिकारी, आश्रमशाळेचे भगत सर, काशिनाथ गाणेकर सर, अशोक यादव, समीर धनसे, चिन्मय मोने, अमोल पवार, महेश पाटील, मंदार मढवी व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# माणगाव वाडीमध्ये पाणीटंचाई

**कर्जत : प्रतिनिधी**


कर्जत तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या माणगाव वाडीमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. माथेरान कडे जाणाऱ्या जलवाहिनीमधून पिण्याचे पाणी मिळत असते, मात्र माथेरान येथे जाणारी जलवाहिनीमधून पाणी पुरवठा होत नसल्याने माणगाववाडी मधील ग्रामस्थांचे तोंडचे पाणी पळाले आहे. ग्रामस्थांना सध्या डवऱ्याचे पाणी हंड्यात साठवून आणावे लागत असून माणगाव वाडीमध्ये ६० घरांची वस्ती आहे.

नेरळ माथेरान घाट रस्त्यात माणगाव वाडी ही आदिवासी वाडी असून माणगाव तर्फे वरेडी ग्रामपंचायत मधील भाग आहे. या गाडीच्या बाजूने माथेरान या शहरासाठी जाणारी जलवाहिनी टाकण्यात आली आहे. स्थानिक आदिवासी लोकांनी जलवाहिनी टाकण्यासाठी आपल्या जमिनी दिल्या आणि त्याबदल्यात वाडी मधील ६० घरांसाठी पिण्याचे पाणी यांची तरतूद करून घेतली.त्या जलवाहिनीमधून पाणीपुरवठा या आदिवासी वाडीला होत असतो आणि वाडीमध्ये असलेल्या प्रत्येक घरी नळाद्वारे पाणी पुरवठा केला जातो. तर वाडीमध्ये पाणी पुरवठ्यासाठी एक विहीरदेखील असून त्या विहिरीचे पाणीदेखील ग्रामस्थ वापरत असतात.

गेल्या १५ दिवसांपासून केवळ दोनच दिवस माणगाव वाडीमधील नळाला पाणी आले आहे. माथेरानला जाणाऱ्या नळपाणी योजनेचे उल्हास नदी येथून माथेरानकडे जाणारे पाणीपुरवठा यंत्रणा मागील १५ दिवसांपासून बंद आहे. त्या ठिकाणी श्री गणेश मंदिराच्या मागे एक झरा असून त्या झऱ्यामध्ये साचणारे पाणी येथील आदिवासी महिला साठवून घरी घेवून पिण्याच्या पाण्याची तहान भागवत आहेत. त्या पाण्याच्या झऱ्यामधून फार कमी प्रमाणात पाणी मिळत असून स्थानिक महिलांना दोन हांडे भरून घेण्यासाठी तासभर थांबून राहावे लागत आहे.



# उल्हास नदीवरील शिरसे पुलाचे काम अंतिम टप्प्यात



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील वासरे परिसरातून वाहणाऱ्या उल्हास नदीवर शिरसे आणि आवळस ही गावे जोडण्यासाठी पूल बांधण्यात यावा अशी अनेक वर्षांपासूनची मागणी होती. २०२३ मध्ये उल्हास नदीवर शिरसे गावाच्या बाहेर पुलाचे बांधकाम सुरु झाले असून या पुलाचे काम अंतिम टप्प्यात आहे. या पुलामुळे पळसदरी रेल्वे स्टेशन कडे जाणे अधिक सोपे आणि जवळचे ठरणार आहे.

कर्जत तालुक्यातील कातळदरा येथे उल्हास नदी उगम पावते आणि त्यानंतर कर्जत तालुक्यातून वाहते. त्यानंतर आडिवली येथून कर्जत शहर अशी पुढे चांदई येथून आंबिवली अशी नेवाळी कोल्हारे दहिवली मालेगाव शेलू आणि पुढे पाषाणे अशी ठाणे जिल्ह्यात जाते. उल्हास नदी ही ठाणे जिल्ह्याची जीवनवाहिनी समजली जाते.या नदीवर शिरसे गावाजवळ पूल बांधण्याची अनेक वर्षांपासूनची मागणी होती.

शिरसे येथे पूल झाल्यास आकूरले पासून नोकरीसाठी तसेच शाळेसाठी जाणारे विद्यार्थी यांना कर्जत स्थानकात उपनगरीय लोकल पकड़ण्यासाठी जाण्याची गरज भासणार नाही. त्यामुळे शिरसे येथे किंवा तमनाथ येथे पूल व्हावा, अशी मागणी होत होती.

स्वामी समर्थ विश्व कल्याण केंद्र, आपटा फाटा (पनवेल) येथे शुभ कार्यासाठी हॉल, वृद्धांसाठी वृद्धाश्रम उपलब्ध आहेत. वेदपाठ, शाळा उपलब्ध आहे.फोनवर बाकीची माहिती मिळेल ८४८३८४२३४४/ ८७७९८७३९४१

# क्रिकेट स्पर्धा व प्रशिक्षणासाठी आरडीसीए तयार करणार स्वतःचे मैदान

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)कडे स्वतःच्या हक्काचे मैदान नसल्याने विविध वयोगातील व वरिष्ठ गटातील मुला-मुलींच्या क्रिकेट स्पर्धा व प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यासाठी खूप अडचणी येत आहेत. सध्या जिल्ह्यातील उपलब्ध असलेल्या मैदानावर आरडीसीएतर्फे उपक्रम घेतले जातात. त्यामुळे असोसिएशन आता स्वतःचे मैदान तयार करणार आहे.

जिल्ह्यातील असलेली मैदाने एकतर खासगी किंवा कंपन्यांची आहेत, तीही काही काळासाठीच आरडीसीएला उपलब्ध करून देण्यात येतात. हीच खंत दूर करण्यासाठी आरडीसीए अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्या पुढाकाराने असोसिएशनचे स्वतःच्या हक्काचे मैदान तयार करण्याचा निर्णय २० डिसेंबर रोजी कर्जतमध्ये आरडीसीएचे उपाध्यक्ष संतोष भोईर यांच्या तमनाथ येथील निवास्थानी झालेल्या विशेष कार्यकरणीच्या सभेत एकमताने घेण्यात आला.

गेल्या आठवड्यात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)तर्फे त्यांच्या अधिकार क्षेत्रातील सर्व २१ जिल्ह्यातील सर्व प्रतिनिधींची विशेष सभा एमसीएचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये एमसीएच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्हा क्रिकेट असोसिएशनला आपापल्या जिल्ह्यातील विविध मैदानांचे संवर्धन व विकास करणे, नव्या मैदानाचे निर्माण करण्यासाठी प्रस्ताव तयार करून तातडीने एमसीएकडे पाठवण्यात यावा; त्यासाठी निधीची तरतूद करण्यात येईल, त्याचबरोबर जिल्हा असोसिएशनच्या मैदानावर एमसीए आयोजित आंतरजिल्हा निवड चाचणी स्पर्धा खेळविण्यात येतील. त्यासाठी प्रत्येक सामन्यासाठी लागणारी आर्थिक तरतूदसुद्धा एमसीएकडून करण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले आहे.

आरडीसीएच्या विशेष कार्यकरिणीच्या सभेत जिल्ह्यातील विविध तालुक्यातील शासकीय जागांचा अहवाल प्रशासनाकडून उपलब्ध करून सादर करण्यात आला. त्यात प्रामुख्याने पेण तालुका हा मध्यावर्ती असल्याने तेथील काही जागा या क्रीडांगणासाठी आरक्षित करून महाराष्ट्र शासनाकडून दीर्घ मुदतीवर भाडेतत्त्वावर मिळाव्यात यासाठी संपूर्ण कागदपत्रांसह अवाहाल तयार करण्यात येणार असून लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात येणार आहे. मैदानासाठी हक्काची जागा मिळावी या संदर्भात संबंधित मंत्र्यांकडे व शासनाकडे शर्थीचे प्रयत्न करण्याचा ठराव सर्वानुमते करण्यात आला. हक्काचे मैदान उपलब्ध झाल्यास जिल्ह्यातील युवा व गुणवान खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळवून देता येणार आहे.

या विशेष कार्यकारणी सभेसाठी आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, उपाध्यक्ष संतोष भोईर, यशवंत साबळे, राजेश पाटील, खजिनदार प्रशांत ओक, सहसचिव जयंत नाईक, सदस्य संदीप पाटील, समीर मसुरकर, कौस्तुभ जोशी, अॅड. पंकज पंडित, प्रदीप खलाटे आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

दि.१६.१२.२०२४ रोजी दैनिक रामप्रहर या वृत्तपत्रात खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्री बाबत प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस रद्द करण्याबाबत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कसळखंड, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गावाचे नाव | स.न./हि. न. | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार |
|---|---|---|---|
| कसळखंड | ११३/१ | ७-७३-००<br>पो.ख. ०-७९-०० | १५.४६ |

मी ॲड. दीपक आर. शेळके कार्यालयीन पत्ता : डी/३/१, किनारा हौं सोसायटी, बावन बंगलो पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६ या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस असे कळवितो की, मी दि.१६.१२.२०२४ रोजी दैनिक रामप्रहर या मराठी वृत्तपत्रात वर वर्णीत मिळकतीबाबत १४ दिवसांची जाहीर नोटीस प्रसीध्द केलेली होती सदर जाहीर नोटीसी मधील मालकाच्या नावामध्ये साधर्म असल्याने नजर चुकीने व अनावधानाने जाहीर नोटीस प्रसीध्द झालेले आहे. वर वर्णीत मिळकतीच्या विक्री बाबत दि.१६.१२.२०२४ रोजीची दैनिक रामप्रहर या मराठी वृत्तपत्रात प्रसीध्द केलेली नोटीस मी या रद्द नोटीस व्दारे मागे घेत आहे. तरी दि.१६.१२.२०२४ रोजीची दैनिक रामप्रहर या मराठी वृत्तपत्रात प्रसीध्द केलेली नोटीस कोणीही व्यक्ती, संस्था वैगेरे यांनी ग्राहय धरू नये.

**ठिकाण : पनवेल**
**तारीख : २१.१२-२०१४**

**सही/-**
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**
पत्ता : डी/३/१, किनारा है सोसायटी,
बावन बंगलो पनवेल ता. पनवेल
जि. रायगड- मो न. ९८२०७९५६०५

# एनएमएमटी बसच्या अपघातांमध्ये घट

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन उपक्रमात मागील काही वर्षात अपघातांची संख्या व मृत्यूमुखी होणाऱ्यांची संख्या घटली आहे. ही समाधानाची बाब आहे, परंतु दुसरीकडे पालिका परिवहन उपक्रमात जीसीसी तत्वावर चालवल्या जाणाऱ्या गाड्यावरील वाहनचालकांची संख्या मोठी असल्यामुळे मुंबईत झालेल्या बेस्ट उपक्रमाच्या अपघातानंतर खासगी तत्वावरील वाहनचालकांबाबत पालिकेने खबरदारी घेण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात येत आहे.

नवी मुंबई महापालिका उपक्रमाच्या बसेसद्वारे मागील आठ वर्षांत जवळजवळ १ हजार अपघात झाले असून आतापर्यंत ३० जणांचा मृत्यू झाला आहे. तर मागील दोन वर्षात अपघातांची संख्याही घटली आहे. नवी मुंबई महापालिका उपक्रमात बसेसची संख्या सातत्याने वाढत असून दुसरीकडे डिझेल व सीएनजीवर चालणाऱ्या गाड्यांची संख्या कमी करून इलेक्ट्रिक वाहनांची संख्या वाढवण्यावर पालिकेचा भर असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. नवी मुंबई महापालिकेच्या उपक्रमात जवळजवळ एकूण २८०० कर्मचारी आहेत. पालिकेकडील ४९८ बसगाड्यांपैकी जवळजवळ २०० बसेसवर जीसीसी तत्वावरील ६० टक्के म्हणजेच जवळजवळ ५४० ठोक मानधनावरील वाहनचालक कार्यरत आहेत, परंतु त्यामध्ये पालिका आपले प्रशिक्षित वाहनचालक देत असल्याचे पाहायला मिळते.

नवी मुंबई महापालिकेच्या उपक्रमामध्ये जीपीएस प्रणालीद्वारे बसेसवर नियंत्रण ठेवले जाते. वाहनचालकांना वारंवार सूचना केल्या जातात तर रॅश ड्रायव्हिंग, बस टॉप चुकवणे अशा तक्रारही प्राप्त होतात. त्यासाठी पालिकेने तक्रारींसाठी टोल फ्री क्रमांक तसेच व्हॉट्सअॅप क्रमांक दिले आहेत. तर नियमावलींचा भंग करणाऱ्यांना वारंवार समज देऊन कारवाई केली जाते.




**प्रवासी वाढले, पण उत्पन्न कमी झाले!**

पालिका परिवहन उपक्रमाने १४ ऑक्टोबर २०२४पासून महिलांना ५० टक्के तिकीट सवलत सुरू केली. त्यामुळे प्रवाशांची दैनंदिन संख्या एक लाख ८० हजारांवरून वाढून दोन लाख २५ हजार झाली, पण पालिका परिवहन उपक्रमाचे दैनंदिन उत्पन्न ३६ लाखावरून ३० लाखांवर आले आहे. दरम्यान, उत्पन्न वाढीसाठी परिवहन उपक्रमाने विविध पर्याय शोधले आहेत.

**उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न**

नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रम तोट्यात असून उत्पन्न वाढीसाठी परिवहन उपक्रमाने विविध पर्याय शोधले आहेत. एकीकडे उत्पन्न वाढीसाठी टास्क फोर्सची निर्मिती केली असताना दुसरीकडे परिवहन उपक्रमांच्या बस डेपोच्या पुनर्विकासातून उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. वाशी सेक्टर ९ येथील बस डेपोच्या पुनर्विकासातून टोलेजंग व्यावसायिक इमारत उभी राहिली आहे. त्यातून परिवहन उपक्रमाला उत्पन्न वाढीची आशा आहे. वाशी बसडेपो प्रमाणेच कोपरखैरणे, बेलापूर या बसडेपोंचा पुनर्विकास केला जाणार आहे. तसेच बसवरील जाहिरातीतून उत्पन्न वाढीचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

# पनवेल आगार परिसरात खासगी ट्रॅव्हल्स बसमुळे अपघातांचा धोका



**पनवेल : वार्ताहर**

बसस्थानकाच्या दोनशे मीटरच्या परिघात खासगी वाहनांना नो इंट्री करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने या आधीच दिले आहेत. याबाबत या आधी वाहतूक शाखेने धडक मोहीम हाती घेतल्याने काही खासगी ट्रॅव्हल्स बसस्थानकासमोरून न जाता पुलावरून जात असून रात्रीच्या वेळी खासगी ट्रॅव्हल्स बसेस बसस्थानकाजवळील उड्डाणपुलाखाली उभ्या राहत असून एसटी महामंडळाचे प्रवासी खाजगी बसने प्रवास करत असल्याने एसटीचे मोठ्या प्रमाणात नुकसान तर होतच आहे, परंतु बस महामार्गाशेजारी बेकायदेशीर उभ्या राहत असल्याने भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पनवेल बसस्थानकापासून जास्तीत जास्त ४० ते ५० मीटर अंतरावर रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात खाजगी ट्रॅव्हल्स थांबत आहेत. एसटीचे प्रवाशी गेल्या अनेक वर्षापासून पळवीत असल्याचे महामंडळाचे म्हणणे होते. त्यामुळे एसटीच्या हातून हजारो प्रवासी तर जात होते त्याचबरोबर लाखो रूपयांचा तोटा होत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. माजी परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी राखीव झोनची घोषणा केली होती. पनवेल बसस्थानकाच्या बाजूच्या खासगी ट्रॅव्हल्स व इतर वाहनांच्या थांब्यावर आगार व्यवस्थापनाने सातत्याने अक्षेप नोंदवत आहेत. संबधीतांवर कारवाई करावी, अशा मागणीचे पत्र कित्येकवेळा पनवेल वाहतूक शाखा आणि नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात पाठविण्यात आले आहेत. ही परिस्थिती केवळ पनवेलच नाही तर इतर ठिकाणीसुध्दा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बसस्थानक व बसथांब्यापासून दोनशे मीटरच्या परिघात खाजगी वाहनांना उभे राहण्यास मनाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले. वाहतुक पोलिसांच्या कारवाईच्या धसक्याने पनवेल बसस्थानकासमोर उभ्या राहणाऱ्या ट्रॅव्हल्स आता नवीन पनवेल सिग्नलजवळ उभ्या केल्या जात आहेत.

कोकणात जाणाऱ्या गाड्याचे तिकिट दर दीड ते दोन हजार रुपये आहे. तर पुणे-सातारा-सांगली पट्ट्यातदेखील खासगीच्या तिकिटाला हजारो रुपयांचा दर आलेला आहे. एसटी भाड्याच्या दीडपटापेक्षा अधिक भाडे खासगी ट्रॅव्हल्सचे नसावे. यापेक्षा अधिक भाडे आकारल्यास खासगी चालक-मालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. भाड्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी प्रादेशिक परिवहन (आरटीओ) विभागाची आहे.

# सायन-पनवेल महामार्गावरून वाहने सुऽऽसाट धावणार

## २७ कोटी कामांची तरतूद मंजूर

**नवी मुंबई : बातमीदार**

नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाकडून सायन-पनवेल महामार्गावरील रस्त्याच्या विविध कामांसाठी २७ कोटी रुपये कामांची तरतूद मंजूर करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात सायन पनवेल महामार्गवरून वाहने सुसाट धावणार आहेत.

हिवाळी अधिवेशनात सायन-पनवेल महामार्गावर विविध कामांसाठी शासनाकडून अनुदान देण्यात येते. या अनुषंगाने बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सायन-पनवेल महामार्गावर सीबीडी बेलापूर उड्डाणपूल सेवा रस्ता येथील खराब पुष्ट्भागाची डांबरीकरणाने सुधारणा करणे, सायन-पनवेल महामार्गावरील उरण उड्डाणपूल स्लिप लेन (दोन्ही बाजू) येथील खराब पुष्टभागाची डांबरीकरणाने सुधारणा, सायन-पनवेल दुतगती महामार्गाची सुधारणा करणे या खासगीकरणातर्गत प्रकल्पातील शिल्लक कामांपैकी वाशी जंकशन ते वाशी शिवमंदिरदरम्यान सेवारस्ता बांधणे, सायन पनवेल महामार्गवरील वाशी उड्डाणपुलाखालील अतिक्रमण रोखनेकारिता लोखंडी ग्रीलचे कुंपण बनविणे, सायन पनवेल महामार्गावरील अपघात रोखनेकारिता उरण फाटा ते वाशी टोलनाकादरम्यान लांबीतील मध्य दुभाजकाची दुरुस्ती व लोखंडी रेलिंग बसवणे आणि इतर अनुषंधिक कामे करणे, वाशी उड्डाणपूलाच्या स्लिप लेनची उजवीकडील पनवेल बाजू येथील डांबरी पुष्ठभागाची सुधारणा करणे आदी कामांसाठी सुमारे २७ कोटी रुपये निधीची तरतूद आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नाने करण्यात आली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात प्लेसमेंट सेलतर्फे विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन





**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सेंटर फॉर करिअर गायडन्स ट्रेनिंग अँड प्लेसमेंट व मॅनेजमेंट स्टडीज विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि.१९) विद्यार्थ्यांसाठी बीएसआयएफमध्ये असणाऱ्या करिअरच्या संधी यावर करिअर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन केले होते.

या करिअर मार्गदर्शनसाठी अनुदीप फाउंडेशनचे प्रतिनिधी यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच भविष्यामध्ये वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या क्षेत्रात असणाऱ्या करिअरच्या संधी याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल मॅनेजमेंट स्टडीज शाखेतील सर्व प्राध्यापक व सेंटर फॉर करिअर गायलेन्स ट्रेनिंग अँड प्लेसमेंट समितीचे सर्व सदस्य, विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन प्रा. डॉ. रीत थुले व प्रा. रेवन शिंदे, प्रा. महेश धायगुडे यांनी केले यांनी केली तसेच मॅनेजमेंट स्टडीज शाखेतील इतर सर्व प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

# चोरांना पकडले

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीमधील दीपक फर्टीलायझर कंपनीमध्ये तीन चोर दीपक फर्टीलायझर कंपनीत शिरुन चोरी करताना कंपनीच्या सुरक्षा यंत्रणेने त्रिकुटाला रंगेहाथ पकडले. यांच्याकडून एक लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. कंपनीलगतच्या वलप गावात राहणारे तीन चोरटे १५ फूटी उंच कुंपनावरून कंपनीत शिरले. चोरट्यांनी लोखंडी पाईप, अँगल, बॉक्स पाईप, जाळ्या आणि नॉयलनच्या दोरीसह दीपक कंपनीच्या सूरक्षा यंत्रणेने चोरट्यांना रंगेहाथ पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. पोलिसांनी या प्रकरणातील संशयीत रामब्रिज चौहान, विकास रामब्रिज चौहान, दीपक चौहान यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# शुभदा नील यांचे महिलांना आजारांबाबत मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील अंगणवाडी सेविकांसाठी महानगर गॅस लिमिटेड द्वारा अंगणवाडी सेविकांना गर्भाशयमुखाचा कर्करोग प्रतिबंध, स्क्रीनिंग, लसीकरण व स्तन कॅन्सर या विषयावर प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ. शुभदा नील यांनी मोलाचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

यासोबतच महानगर गॅस लिमिटेड द्वारा अंगणवाडी सेविकांची नील हॉस्पिटल येथे ३ हजार रुपयांची एचपीव्ही डीएनए चाचणी गर्भाशयमुख कर्करोग स्क्रीनिंग चाचणी मोफत करण्यात आली.

बीके डॉ शुभदा नील यांनी प्रविण पाटील CDPO ICDS पनवेल व अंगणवाडी सेविका सुपरवायझर यांचा सत्कार केला.

# नेरूळमधील विकासकामांचा ज्येष्ठांच्या हस्ते शुभारंभ

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूर विभागातील वार्ड क्रं ९८ माजी नगरसेविका सपना गायकवाड गावडे यांच्या पाठपुराव्यातून नवी मुंबई मनपा नेरूळ वार्ड क्रं ९८ मधील विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. स्थानिक नगरसेविका सपना गावडे यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

प्रभागातील श्री गणेश सोसायटीच्या गेटसमोरील गार्डन सुशोभीकरण उद्घाटन व ज्वेल ऑफ नवी मुंबई येथील गेटच्या बाहेर सार्वजनिक शौचालय व टॉयलेटचे उद्घाटन विभागातील जेष्ठ नागरिकांच्या हस्ते झाले.

या वेळी माजी उपमहापौर अशोकराव गावडे, माजी नगरसेविका निर्मला गावडे, भगवान खुपटे, त्रिलोक धोडी, संतोष भोर, काळुराम गायकवाड, राकेश घरत आदी उपस्थित होते.



# भरधाव कारने दुचाकीस्वारास नेले फरफटत

## फरार चालकाचा शोध सुरू

**नवी मुंबई : बातमीदार**

भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना ऐरोलीमध्ये घडली. अपघातानंतर कारचालक पळुन गेला असुन पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

ऐरोली सेक्टर ८ येथे बुधवारी सकाळी ही दुर्घटना घडली. परिसरात राहणारा प्रसाद आवटे मोटारसायकलवरून कामाला चालला होता. यावेळी पाठीमागून आलेल्या भरधाव कारने त्याला धडक दिली. या धडकेने तो रस्त्यावर पडला असताना देखील चालकाने कार न थांबवता ती पळवली. कारच्या पुढील भागात अडकलेला प्रसाद काही अंतरापर्यंत कारसोबत फरफटत गेला.काही अंतरावर तो रस्त्यालगत पडून राहिला असता त्याच ठिकाणी तो बेशुद्ध झाला.

त्यापूर्वी त्याने आईला फोन करून अपघाताची माहिती दिल्याने वेळीच त्याला उपचार मिळू शकले. उपचारानंतर शुद्धीवर आल्यानंतर त्याने घडलेल्या घटनेची स्वत: च पोलिसांकडे तक्रार केली. अज्ञात कारचालकावर गुन्हा दाखल केला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

# वीर वाजेकर महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील वीर वाजेकर, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात गुरुवारी (दि. १९) राष्ट्रीय सेवा योजना, अपोलो हॉस्पिटल, बेलापूर व लायन्स क्लब NPST आणि लायन्स क्लब द्रोणागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

आपोलो हॉस्पिटल बेलापूर येथील डॉ.निलेश भराडे, श्री.विठ्ठल वाडकर, वैशाली सोजे, मेहूल जखवाले,संगीता सिंग, श्रेया सुतार, दिव्या चौधरी यांनी विद्यार्थ्यांची तसेच इतर लोकांची आरोग्य तपासणी केली. तपासणी अंतर्गत वजन, उंची, रक्तदाब, रक्तातील साखर (Blood Sugar) नेत्र तपासणी, ई. सी.जी. तपासणी करण्यात आली. महाविद्यालयातील विद्यार्थी, बाह्यरुग्ण,माजी विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापक व सेवक, या तु.ह.वाजेकर ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मोफत आरोग्य तपासणी करून घेतली. महाविद्यालयातील प्राध्यापक व सेवकांनी आरोग्य तपासणी करून घेतली.



आरोग्य तपासणी दरम्यान अवयवदान याविषयावरप्रार्थना नाथ, अपोलो हॉस्पिटल यांनी अवयव दानाविषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.आमोद ठक्कर यांनी सर्व डॉक्टर, तसेच लायन्स क्लब द्रोणागिरी यांचे मनापासून स्वागत व आभार मानले. या संपूर्ण आरोग्य तपासणीसाठी लायन्स क्लब द्रोणागिरी, अपोलो हॉस्पिटल यांचे विशेष सहकार्य लाभले.

उपप्राचार्य, प्रा.दिलीप केंगार, प्रा.गजानन चव्हाण,डॉ. संदीप घोडके, डॉ.राहुल पाटील उपस्थित होते.प्रा.योगेश कुलकर्णी, प्रा.भूषण ठाकूर, प्रा.प्रांजल भोईर,प्रा.संतोष देसाई, प्रा.पंकज भोये, डॉ. रत्नमाला जावळे यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षकेतर सेवकांचे सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेचे रिद्धी तांडेल, शुभम ठाकूर, ठोंबरे, सिद्दी शिंदे, सुरेखा म्हात्रे यांनी आयोजनात मदत केली.

# मोहोपाडा येथे जुगाऱ्यांवर कारवाई

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोहोपाडा येथे जुगार खेळणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. यात १९ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मोहोपाडा गावाच्या हद्दीतील प्रिआ स्कुलचे जवळ असलेल्या आंब्याच्या झाडाच्या खाली मोकळ्या जागेत पाच आरोपी हे बेकायदेशीररित्या पैसे लावून स्वतःचे फायद्याकरिता पत्ते खेळत होते. त्यांच्याकडे दोन हजार १५० रूपयाची रोख रक्कम तसेच १७ हजार रूपये किमतीचे तीन मोबाईल असा एकुण १९ हजार १५० रूपये किमंतीचा मुद्देमाल मिळून आला.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास पोलीस हवालदार पानपट्टे हे करीत आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे जुगारुंचे धाबे दणाणले आहेत.

# नवी मुंबईत स्वच्छ शौचालय अभियान

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ भारत मिशन २.० शहरी' अंतर्गत स्वच्छ शौचालय अभियान २०२४' जाहीर करण्यात आले असून स्वच्छतेला महत्व देणाऱ्या नवी मुंबई शहरामध्ये महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ शौचालयाची मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

यामध्ये संपूर्ण शहरातील सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची सखोल स्वच्छता करण्यात येत असून नागरिकांमध्येही सार्वजनिकरित्या वापरली जाणारी शौचालये व घरगुती वापरातील शौचालये यांचा आरोग्यपूर्ण वापर करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सर्व विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत स्वच्छ शौचालय मोहीम ही सर्वांची सामुहिक जबाबदारी असल्याचे स्पष्ट करीत घनकचरा व्यवस्थापन विभागासोबतच सर्वच विभागांनी यात जागरुकतेने सहभागी होण्याचे निर्देश दिले. आठही विभागांसाठी नेमलेल्या



नोडल अधिकाऱ्यांनी आपापल्या विभागीय क्षेत्रातील शौचालयांच्या स्वच्छतेची व सुस्थितीची पाहणी करावी व आवश्यक त्या उपाययोजना त्वरित करून घ्याव्यात असे निर्देश दिले.

विशेषत्वाने महानगरपालिकेच्या शाळांमधील शौचालयांकडे लक्ष देण्याचे आयुक्तांनी निर्देश दिले. ही पाहणी केवळ अभियानापुर्ती मर्यादित न ठेवता याची कायमस्वरुपी अंमलबजावणी करावी असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले आहे. या मोहिमेंतर्गत शौचालये वापरात असावीत, येण्याजाण्यास सुलभ असावीत, स्वच्छ असावीत, इकोफ्रेंडली असावीत आणि सुरक्षित असावीत अशा प्रमाणकांनुसार काम करण्यात येत आहे. या मोहीमेव्दारे शौचालयांची स्वच्छता, सुलभता व टिकाऊपणा यावर भर देण्यात येत आहे. या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग व स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्ष यांच्या वतीने आयुक्त महोदयांच्या मार्गदर्शनानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली, विभागातील परिमंडळ १ चे उपआयुक्त डॉ. अजय गडदे व परिमंडळ २ चे उपायुक्त संतोष वारुळे आणि सहकाऱ्यांनी स्वच्छ शौचालय अभियानाचे सुव्यवस्थित नियोजन केले असून शौचालयांचा वापर, स्थिती आणि स्वच्छता अशा सर्वच दृष्टीने लक्ष केंद्रीत करीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत सर्व सार्वजनिक आणि सामुदायिक शौचालयांची विभागीय अभियंत्यांमार्फत बारकाईने पाहणी करण्यात आली असून आवश्यक त्या ठिकाणी तत्परतेने सुधारणा व दुरूस्ती कामे करून घेण्यात येत आहेत.

**आज होणार स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन**

नवी मुंबई शहरात स्वच्छता ही कायमस्वरूपी करण्याची बाब असल्याने रविवारी (दि.२२) होणाऱ्या स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉनमध्ये उत्साहाने नावनोंदणी करीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले आहेत. सकाळी ५.३० वा. हाफ मॅरेथॉनला २१ किमी. अंतराच्या गटापासून प्रारंभ होत असून नवी मुंबई पालिका मुख्यालयापासून सानपाडा मोराज सर्कलपर्यंत जाऊन तेथून यू टर्न घेऊन पुन्हा मुख्यालयापर्यंत धावपटूंनी यायचे आहे. त्याचप्रमाणे सकाळी ६.१५ वा. सुरू होणाऱ्या १० किमी. अंतराच्या हाफ मॅरेथॉनमध्ये सहभागी धावपटूंनी मुख्यालयापासून वजिरानी सिग्नलपर्यंत धावत जाऊन त्या ठिकाणाहून यू टर्न घेऊन परत मुख्यालयापर्यंत यायचे आहे. याशिवाय ७ वा. सुरू होणाऱ्या ५ किमी. अंतराच्या गटासाठी मुख्यालयापासून सुरूवात केल्यानंतर नागरिकांनी अक्षर सिग्नलपासून यू टर्न घेऊन मुख्यालयापर्यंत परतायचे आहे.

# संघ हीच नवलाई

नॅशनल स्पेलिंग बी स्पर्धेची सुरुवात झाली लुईसव्हिलेपासून. अवघ्या आठ स्पर्धकांनिशी स्पर्धेला प्रारंभ झाला. १९४३-१९४४-१९४५ अशी तीन वर्षे ही स्पर्धा होऊ शकली नाही, ती दुसऱ्या विश्व युद्धाच्या पार्श्वभूमीवर. बाकी सर्व वर्ष ही स्पर्धा चालली आणि आज २०२४मध्ये या स्पर्धेत भाग घेतलेल्या स्पर्धकांची संख्या पोहचली आहे ११ दशलक्षांवर आणि २०२४च्या स्पर्धेच्या अंतिम फेरीत उरलेले स्पर्धक होते सात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचंही असंच आहे. अवघ्या मूठभर शिशूंना हाताशी धरून संघ संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी १९२५ साली विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली आणि आज संघाचं काम केवळ भारतातच नव्हे; तर जगाच्या पाठीवर जिथे जिथे हिंदू बांधव राहतात अशा पन्नासहून अधिक देशांपर्यंत पोहचलं आहे आणि संघ स्वयंसेवकांची, संघ समर्थकांची संख्या कोट्यवधीत पोहचली आहे. इतकी मोठी संघटना शंभर वर्षे टिकून राहते, तिच्यात फूट पडत नाही, तिच्या नेतृत्वात स्पर्धा होत नाही हा संघटनशास्त्रातला एक मोठा चमत्कार मानला जातो. म्हणूनच या अंकासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हीच एक संघटन शास्त्रातील नवलाई मानावी अशी गोष्ट बनली आहे.

सरलेल्या विजयादशमीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने ९९ वर्षे पूर्ण करून शंभराव्या वर्षात पदार्पण केले. संघाविषयी जाणून घेत असताना एक गोष्ट प्रारंभीच लक्षात घेतली पाहिजे की संघ ही रूढार्थानं संघटना नाही, ती एक वैचारिक स्वयंसेवी चळवळ आहे. जगाच्या पाठीवरील ८२पेक्षा अधिक देशात संघाच्या शाखा सुरू आहेत. असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही, की भारत सरकारच्या देशोदेशी असणाऱ्या वकिलातींच्या संख्येच्या खालोखाल ज्यांच्या जगभरात अधिकाधिक शाखा आहेत, अशी एकमेव संघटना म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आहे. आजवर संघावर अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत, ग्रंथ प्रकाशित झाले आहेत, काहींनी तर संघावर प्रबंध लिहून डॉक्टरेटदेखील मिळवली आहे. या प्रकाशनांमधून संघाचे जे दर्शन वाचकांना घडले आहे, घडते आहे, ते इतके अथांग आहे की त्याचा पार लागणेही अवघड आहे.

वास्तविक पाहता १९२५च्या विजयादशमीला निवडक सहकाऱ्यांच्या एका बैठकीत आज आपण संघ सुरू करतो आहोत अशी निव्वळ औपचारिक घोषणा डॉ. हेडगेवारांनी केली होती, पण ती औपचारिक नावापुरतीच होती, कारण तिची पूर्वपीठिका तब्बल दहा-बारा वर्षं मागे जाणारी होती. हा देश हिंदूंचा आहे, हे साऱ्या देशाला आणि जगाला ठाऊक होतं, पण हा समाज संघटित नाही, त्याच्या राष्ट्रीयत्वाचा त्याला विसर पडलेला आहे, हे भारतावर चालून येणाऱ्या आक्रमकांना पक्कं ठाऊक होतं आणि त्यातूनच त्यांनी व्यापाराच्या मार्गानं, शिक्षणाच्या मार्गानं, विकासात्मक गोष्टींच्या मार्गानं या देशाला फोडण्याचा आणि झोडण्याचा एककलमी कार्यक्रम हाती घेतला होता. व्यापारातून देश बळकावण्याच्या सर्वच आक्रमकांच्या वृत्तीला पराभूत करायचं असेल तर समाजाचं स्वत्व जागं करावं लागेल, राष्ट्रीयत्वाचा अंगीकार करावा लागेल आणि समाजाचंचे संघटन करून देश घडवावा लागेल हे डॉक्टरांनी ओळखलं होतं.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्या उद्देशानं सुरू झाला होता. 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' यावर डॉक्टरांचा दृढ विश्वास होता. भारताच्या अवनतीची कारणं राजा राममोहन रॉय यांच्यपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत प्रत्येक सुधारणावादी नेत्यानं जशी शोधून काढली होती, तशीच ती डॉ. हेडगेवारांनीही मूलगामी चिंतनातून जाणून घेतली होती. समाजाच्या अवनतीची सर्व लक्षणं आत्मविस्मृतीतून निर्माण झाली आहेत हे सत्य त्यांना गवसलं होतं. आपण आपला धर्म विसरलो आहोत, आपली संस्कृती विसरलो आहोत, आपला संघटन विचार विसरलो आहोत याचबरोबर आपण (हिंदू समाज) स्वतःपुरता विचार करतो आहोत, समाज-देश-राष्ट्र याच्याशी माझं काही देणं लागतं हेच तो विसरला आहे हे त्यांनी ओळखलं होतं. त्यामुळेच समाजाला संघटित करण्यासाठी त्याची आत्मस्मृती जागी केली पाहिजे हे ओळखून त्यांनी संघ सुरू केला होता, पण संघ सुरू केला म्हणजे नेमकं काय केलं हे जाणून घेतलं पाहिजे.

डॉक्टरांनी आपला धर्म, संस्कृती, परंपरा, जीवनमूल्य, श्रेष्ठ विचार जगून दाखवणारी कार्यपद्धती शोधून काढली. त्या कार्यपद्धतीलाच नाव दिलं संघशाखा. या पद्धतीचं उद्दिष्ट एकच व्यक्तीनिर्माण. संघ शाखा हा त्याचा मूळ आविष्कार, पण संघ शाखेत न येणाऱ्या आणि तरीही ही जीवनमूल्य मानणाऱ्या/ जगणाऱ्या सामान्य नागरिकांसाठी संघानं पुढील काळात त्यांच्या त्यांच्यासाठी आवश्यक कार्यक्षेत्रं उभारली, त्या कार्यक्षेत्रांशी त्यांना जोडून घेतलं. त्यात विद्यार्थी, कामगार, सहकार, कला, वैद्यकीय सेवा, वनवासी, पर्यावरण, समरसता, प्रसार माध्यम, क्रीडा, इतिहास, श्रद्धाजागृती, कृषी, मातृशक्ती व स्त्रीशक्ती अशा सुमारे चाळीस-पन्नास क्षेत्रांचा अंतर्भाव होता व आहे. ही सर्व क्षेत्रं मानवी जीवनाला स्पर्श करणारी आहेत.

संघाचा हा प्रवास विना-विघ्न पार पडला असं घडलेलं नाही. संघाच्या कामाची भीती वाटणाऱ्या सरकारांनी तीन वेळा संघावर बंदी घातली, पण संघ स्वयंसेवक त्या विरोधात संघटितपणे उभे राहिले, त्यांनी समाजमन आपल्या बाजूनं वळवलं आणि बंदी उधळून लावली. याच सरकारांनी सरकारी नोकरीतील कर्मचाऱ्यांना संघकार्यात भाग घेता येणार नाही, असे नियम बनवले, पण स्वयंसेवकांनी ते न जुमानता संघकार्य केलं आणि संघ स्वयंसेवक चांगलं काम करीत आहेत हे ठाऊक असल्यानं अधिकाऱ्यांनी त्याकडे सोयीस्कर डोळेझाकही केली.

शंभर वर्षांच्या नवलाईपूर्ण वाटचालीत संघाला सहा सरसंघचालक लाभले. संघ संस्थापक डॉ. हेडगेवार यांनी १९२५ला संघाची स्थापना केली, ते १९४० साली गेले. त्यांच्यानंतर श्रीगुरुजी सरसंघचालक झाले ते तब्बल ३३ वर्षे कार्यरत राहून १९७३ साली गेले. त्यांनी संघकार्याची धुरा सोपवली ती बाळासाहेब देवरस यांच्याकडे. त्यांना



> २०२५
> हे वर्ष जगाच्या पाठीवर अनेक कारणांनी, अनेक संस्था-शहरांच्या संदर्भात शताब्दी वर्ष म्हणून साजरं केलं जाणार आहे. क्वान्टम सायन्स आणि टेक्नॉलॉजी यासाठीचं हे जसं शंभरावं वर्ष आहे तसंच ते नॅशनल स्पेलिंग बी स्पर्धेचंदेखील शंभरावं वर्ष आहे. व्हिक्टोरिया टर्मिनस ते कुर्ला या दरम्यान धावलेल्या पहिल्या इलेक्ट्रिक रेल्वेचं जसं शंभरावं वर्ष आहे तसंच भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचंही शंभरावं वर्ष आहे. १९२५ हे जसं द कंपनी ऑफ बायोलॉजिस्टसचं शंभरावं वर्ष आहे तसंच ते द ग्रँड ओल ऑप्रीचंही शंभरावं वर्ष आहे. १९२५ हे सिटी ऑफ नॉर्थ बे चं शंभरावं वर्ष आहे, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचं शंभरावं वर्ष आहे आणि हिंदू संघटन या प्रमुख विषयाला वाहून घेतलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या सेवाभावी संघटनेचंदेखील शंभरावं वर्ष आहे.

२१ वर्षे मिळाली, १९९६ साली ते गेले, पण तत्पूर्वीच १९९४ साली त्यांनी सरसंघचालकपदाची जबाबदारी प्रा. रज्जूभय्या यांच्याकडे सोपवली होती. त्यांना अवघी सहा वर्षेच मिळाली. ते २००३ मध्ये गेले, पण त्यांनी तत्पूर्वीच २००० साली सरसंघचालकपद सुदर्शनजी यांच्याकडे सोपवलं होतं. सुदर्शनजी २०१२ साली गेले, त्यांना नऊच वर्षे मिळाली. तत्पूर्वीच म्हणजे २००९ साली त्यांनी आपली जबाबदारी डॉ. मोहनराव भागवत यांच्याकडे सोपवली होती. सहा सरसंघचालक झाले, पण संघविचारसूत्र डॉक्टर हेडगेवार यांच्यापासून आजतागायत तसंच राहिलं, संघाची कार्यनवलाई ती हीच.

संघाचा स्वयंसेवक टिपिकल खाकी अर्धी विजार घालणारा, डोक्यावर काळी टोपी घालणारा, हातात दंड धारण करणारा, चौकोनी चेहऱ्याचा असल्याचं चित्र मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमात दाखवण्याचा प्रयत्न अनेकांनी केला, पण संघ खरोखरचा कसा आहे हे यातल्या एकालाही कधी कळले नाही किंवा संघाचे खरे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न त्यांनी कधी केलाच नाही. संघाच्या राष्ट्रभक्तीविषयी, संघ स्वयंसेवकांच्या चारित्र्याविषयी, त्याच्या त्यागी वृत्तीविषयी कुणीच शंका घेत नाही, पण हे सारं संघात घडतं कसं, माणूस घडवण्याचं शिक्षण संघात कसं दिलं जातं, स्वयंसेवक आणि संघ हे दोन शब्द आपल्या संघटनेच्या नावात समाविष्ट केल्यानं हे घडतं का यासाठी कोणता अभ्यासक्रम संघात राबवला जातो, संघ शिक्षा वर्ग म्हणजे नेमकं काय असतं हेदेखील जाणून घेण्याचा फारसा प्रयत्न संघाचे टीकाकार करताना दिसत नाहीत. याउलट संघ स्वयंसेवकाला जर याविषयी विचारलं तर तो म्हणतो, संघ समजून घ्यायचा असेल तर संघशाखेत या, तिथे सगळी उत्तरं मिळतात आणि ते एका परीनं खरंही आहे.

संघाविषयीचं वाढतं कुतूहल पाहून संघानं काही वर्षांपूवी जॉईन आरएसएस नावाची मोहीमच हाती घेली. असंख्य तरुण पदवीधर, उद्योजक, संशोधक, संघटक अशा मोहिमेतून संघाच्या जवळ आले आणि कालांतराने संघमय झाले. अनेकांची अशी समजूत असते की शाखेत संघ, संघटन अशा जड-गंभीर विषयांवर चौकोनी चेहरे करून चर्चा होत असेल, पण प्रत्यक्षात संघ-शाखेवर आल्यावर लक्षात येते ते इथे गंभीर वातावरणाचा मागमूसही नसतो ते. संघ शाखांवर चालतात ते व्यायाम प्रकार, सूर्यनमस्कार, खेळ, गीतगायन, एखाद्या विषयावरची मुक्त चर्चा आणि अखेरीस म्हटली जे ती संघप्रार्थना. जे काही चालतं ते हसत-खेळत. संघकार्य वाढतं ते घर-नोकरी-व्यवसाय सांभाळून संघकामासाठी अधिक वेळ देणाऱ्या स्वयंसेवकांमुळे आणि शिक्षण संपवून नोकरी-उद्योग-संसाराला लागण्यापूर्वी संघकार्यासाठी सारं आयुष्य देणाऱ्या व्रती स्वयंसेवकांमुळे. संघात अशा कार्यकर्त्यांना प्रचारक म्हटलं जातं. त्यांना ना वेतन मिळत, ना मानधन, पण संघ अशा कार्यकर्त्यांची काळजी आयुष्यभर किंवा तो प्रचारक म्हणून कार्यरत असेतोवर घेत राहतो. संघाचे भूतपूर्व प्रांत संघचालक बाबाराव भिडे मोजकं बोलायचे, पण चपखल बोलायचे.





ते म्हणायचे, संघाचा प्रचारक म्हणजे कोरं पोस्टाचं पाकीट. ज्या शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात त्याला पाठवायचं तिथला पत्ता लिहायचा आणि स्टँप लावून पाकीट फक्त पोस्टात टाकायचं तेवढंच.

संघात पदाधिकारी असतात, गणशिक्षक असतो, मुख्यशिक्षक असतो, कार्यवाह असतो, शहराला किंवा त्यावरच्या क्षेत्राला संघचालक असतो, पण प्रचारक हा त्या सर्वांपेक्षा वेगळा असतो, तो कसलाच घटनात्मक पदाधिकारी नसतो. पण तो एक दुवा असतो, संघाच्या कनिष्ठ आणि वरिष्ठ पदाधिकाऱ्यामधला. प्रचारक ही एक अशी संकल्पना जी सहजगत्या समजत नाही. कारण अशी व्यक्ती व्यावहारिक जगात भेटतच नाही. १९२९ साली अनौपचारिकरित्या प्रचारक या संकल्पनेला सुरुवात झाली, ती विद्यार्थी म्हणून शहराशहरात गेलेल्या नागपूरच्या स्वयंसेवकांद्वारे. आणि शिक्षण संपवून नोकरी-संसाराला न लागता पूर्ण आयुष्य संघकार्यासाठी देणारे प्रचारक प्रथम नागपुर्बाहेर पडले ते १९४२ नंतर. त्यांनी जागोजागी संघ रुजवला, वाढवला, उभा केला आणि टिकवलाही. प्रचारक म्हणजे एका अर्थाने चालता बोलता संघच. संघ उभा करणारी ही व्रतस्थ जीवनाची नवलाईच..

संघातल्या नवलाईचा आणखी एक अँगल लक्षात घ्यावा असा आहे. सार्वजनिक जीवनात आपण असे अनेक नेते-कार्यकर्ते पाहतो की ज्यांचे सार्वजनिक आयुष्य वेगळे असते आणि खाजगी आयुष्य वेगळे असते. समाजात वावरताना आपण सभ्य दिसलो पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असतो. कुणीही आपल्या खाजगी आयुष्यात डोकावू नये यासाठी ते काळजी घेत असतात. संघ प्रचारकाच्या बाबतीत असे सार्वजनिक आणि खाजगी आयुष्य वेगवेगळे नसतेच. त्यांचे जीवन कोऱ्या पाटीसारखे असते, किंवा वर उल्लेख केल्याप्रमाणे पत्ता न लिहिलेल्या पाकिटासारखे असते. अशी असंख्य कोरी पाकिटे गेल्या शंभर वर्षात संघ निर्माण करत राहिला, त्यावर पत्ते टाकीत राहिला. तुझं शिक्षण संपलं आहे, घरच्यापेक्षा देशाला तुझी गरज अधिक आहे, तू संघासाठी आपलं आयुष्य द्यावंस याची गरज आहे असं डॉ. हेडगेवारांपासून डॉ. भागवतांपर्यंत सर्वच सरसंघचालक सांगत राहिले आणि आपल्या संपर्कातील कोऱ्या पाकिटांवर पत्ते टाकीत राहिले. त्यातले काही पत्ते आपापल्या प्रांतातले निघाले, काही पूर्वोत्तर भारतातले. आणि काही, तर देशांच्या सीमांपारचे. संघ त्यातून घडत राहिला, त्या त्या प्रचारकांच्या संघटन अनुभवांची नवलाई समाजाला देत राहिला.

पत्ता न लिहिलेल्या पाकिटाचे एक उदाहरण इथे दिल्याशिवाय राहवत नाही. हे उदाहरण शिवरामपंत जोगळेकर यांचे. संघाने शिवरामपंतांना तत्कालीन मद्रास प्रांतात पाठवले. दादाराव परमार्थ तेव्हा तिथे प्रांत प्रचारक होते. मद्रासच्या संघ कार्यालयात पोचल्यावर दादा परमार्थ शिवरामपंतांना म्हणाले, समोर भिंतीवर मद्रास प्रांताचा नकाशा लावला आहे. त्यातील जे गाव चांगले वाटेल ते सांग. शिवरामपंतांना सगळीच गावे अपरिचित. तरीही त्यांनी जे बरे वाटले ते नाव सांगितले आणि दुसऱ्या दिवशी दादारावांनी त्या गावचे बस तिकिट शिवरामपंतांच्या हातात ठेवले. ते म्हणाले, जा आता या गावाला आणि कर संघाची शाखा सुरू. शिवरामपंत म्हणाले, दादाराव, अहो त्या गावात माझी ओळखीचे कुणीही नाही, मला ती भाषाही येत नाही, मी कसे काय काम सुरु करू? दादाराव त्यांना म्हणाले, तुला काय करायचे हे ठाऊक असेल, तर ते कसे करायचे हे तुला आपोआप उमजेल. तसेच घडले. शिवरामपंत त्या गावात गेले आणि उरलेले अवघे आयुष्य त्यांनी मद्रास प्रांतातच प्रचारक म्हणून व्यतीत केले. आपलं गाव, आपला समाज, आपले जातबांधव, आपलं परिचितांचं सुरक्षित वातावरण सोडून अन्यत्र कुठे जायला आजच्या समाज-जीवनात कोण तयार असतो? संघकार्याचं वैशिष्ट्य, संघकार्यातली नवलाई हीच तर आहे..

संघात घडवण्याची आणि घडवून घेण्याची प्रक्रिया अखंड सुरू असते. कुंभार एखादे मातीचे भांडे घडवीत असताना फिरत्या चाकावर ठेवलेल्या मातीच्या गोळ्याला आकार देण्यासाठी आपल्या दोन्ही हातांचा कौशल्याने वापर करत असतो. संघात अनेक हातांचा वापर करण्याची ही प्रक्रिया अवलंबली जाते ती माणसे घडवताना. संघात शाखेचा कार्यकर्ता शाखेतल्या स्वयंसेवकांना घडवत असतो, तर प्रवासी कार्यकर्ता शाखेच्या पदाधिकाऱ्यांना घडवत असतो. त्यामुळेच संघात प्रत्येकजण शिक्षक असतो आणि प्रत्येकजण स्वयंसेवकही असतो. ही घडण्या-घडवण्याची प्रक्रिया निरंतर सुरु असते. माणूस घडणीचा हा यज्ञ गेली शंभर वर्षे अखंड सुरु आहे, हे संघाच्या कार्यातले वेगळेपण आहे, संघातली ही कार्यकर्ता-निर्मितीची नवलाई हेच संघाचे वैशिष्ट्य आहे.

संघकार्याचं वेगळेपण, संघकार्याची नवलाई आणखी एका गोष्टीत दडलेली आहे, ती आहे संघकार्यामागे उभ्या असलेल्या मातृशक्तीची. ती ताकद किती मोठी आहे याची खूणगाठ पटवणारे अनेक प्रसंग. आणीबाणी काळातील एक घटना. आणीबाणी जरी झाल्यानंतरची पहिलीच संक्रांत. घरोघरी तिळगुळ खाल्ला जाणार, घरोघरी गुळाच्या पोळ्या होणार पण तुरुंगात डांबल्या गेलेल्या स्वयंसेवकांना गुळाच्या पोळ्या कशा मिळणार? मनात विचार आला मात्र, घरोघरी निरोप गेले, गुळाच्या पोळ्या गोळा झाल्या आणि तुरुंगात असलेल्या राजबंद्यांनाच नव्हे, तर अन्य कैद्यांनाही पोटभर होतील इतक्या गुळाच्या पोळ्या महाराष्ट्रातील शहरा-शहरातून गोळा झाल्या. गुळाच्या पोळ्या हे एक उदाहरण. केशवराव केळकर हे संघाचे एक ज्येष्ठ प्रचारक. प्रचारक म्हणून थांबल्यानंतर महाराष्ट्रातील वनवासी भागात संघाचं काम उभं करण्यासाठी संघाच्या अधिकाऱ्यांनी स्वयंसेवकांना आवाहन केलं तेव्हा अनेक आजी-माजी प्रचारक वेगवेगळी कामं घेऊन वनवासी भागात ठाण मांडून बसले. संघाच्या कुठल्याही यंत्रणेवर भार पडणार नाही, पण नवनव्या आयमातून काम उभं राहील याची काळजी या स्वयंसेवकांनी घेतली आणि त्यासाठी लागणारा निधी अशा घरोघरच्या मातृशक्तीच्या संघटित प्रयत्नातून उभा राहील यासाठीची स्वतंत्र यंत्रणा उभी केली..

सेवा कार्य हा संघाच्या कार्याचा एक अविभाज्य भाग. संघाच्या स्थापनेला जशी २०२५ सालात शंभर वर्षे पूर्ण होताहेत, तशीच संघकार्याचा अविभाज्य भाग बनलेल्या सेवाकार्याला देखील त्याच्या पुढील वर्षी म्हणजे २०२६ साली शंभर वर्षे पूर्ण होणार आहेत. नागपूरजवळच्या रामटेक या गावी श्रीराम नवमी उत्सव मोठ्या प्रमाणावर होत असे. या उत्सवाला समाजकंटक जाणीवपूर्वक त्रास देत. आय-बहिणींची छेडछाड करीत, त्यांचे विनयभंग करीत. डॉ. हेडगेवारांच्या नेतृत्वाखाली नव्यानेच स्थापन झालेल्या संघ स्वयंसेवकांनी मनाचे श्लोक म्हणत संपूर्ण उत्सवाचे संचालन केले. तेव्हापासून आजपर्यंत रामटेकची यात्रा लोकांनीच स्वतःहून स्वीकारलेल्या संचालनातून व्यवस्थित पार पडते आहे. अशी असंख्य उदाहरणे. दरिद्रीनारायणाची सेवा, संकटग्रस्तांची सेवा, वंचित-अभावग्रस्त-दुःखी बांधवांच्या जीवनात आनंद निर्माण करणारी सेवा, दुर्गम भागातील लक्षावधी वनवासी विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षणाची गंगा पोचवणारी सेवा, सामाजिक समरसता निर्माण करणारी सेवा असे कितीतरी प्रकार. डॉ. हेडगेवारांच्या जन्मशताब्दीनंतर संघाने हा सेवाकार्याचा पैलू विस्तारत नेला आणि आज शताब्दी वर्षात संघाकार्यापासून प्रेरणा घन सुरु झालेली दीड लाखांहून अधिक छोटी-मोठी सेवाकार्ये देशभरात कार्यरत आहेत. संघस्वयंसेवकांनी सुरु केलेली इतकी सेवाकार्ये देशभरात सुरू आहेत, हे सांगण्यात संघाला कोणतीही फुशारकी वाटत नाही. किंबहुना ही सेवाकार्ये दीर्घकाळ करावी लागू नयेत, जितक्या लवकर समाजातला वंचित, अभावग्रस्त घटक स्वावलंबी होईल तितक्या लवकर ही कार्ये बंद करण्याची वेळ संघावर यावी, तोच दिवस संघासाठी सोन्याचा ठरेल अशी संघाची धारणा आहे. संघकार्याच्या सेवावृत्तीची नवलाई हीच आहे..

संघाची नवलाई अशी अनेक पैलूंमध्ये प्रकट झाली आहे, होते आहे. त्या प्रत्येक पैलूंविषयी इथे लिहिणं शब्दमर्यादेत शक्य नाही. संघाला हवं ते सगळं होईल, पण संघ काहीच करणार नाही. जे काही घडेल ते स्वयंसेवकांच्या स्वयं-प्रज्ञेतून घडेल, हा त्याचा गर्भितार्थ. स्थूलमानाने कुठलीही संस्था आपला वाढदिवस साजरा करते, रौप्य, सुवर्ण, हिरक, अमृत, शताब्दी अशा अनेक महोत्सवांचा त्यात अंतर्भाव असतो. संघाने कटाक्षाने असे महोत्सव साजरे केले नाहीत आणि संघ संस्थापक डॉक्टर हेडगेवार आणि पूजनीय गुरुजी हे दोनच सन्माननीय अपवाद वगळता कुणाचीही शताब्दी साजरी केलेली नाही. अगदी शताब्दीच्या निमित्तानेही संघाने संकल्प केले आहेत ते कार्यविस्ताराचे, नवनव्या क्षेत्रातील पदार्पणाचे आणि त्या पदार्पणातून समाजासमोरील जगड्व्याळ समस्यांना हात घालण्याचे. संघ कार्यातील ही नवलाई थक्क करणारी आहे..

संघासारख्या संस्थेचं काम सुरु करणं, चालवणं, त्यात कुठेही तडजोड होणार नाही याची काळजी घेणं हे सोपं काम नव्हतं. संघकार्य देशभर चालतं ते संघ स्वयंसेवकांच्या खिशातून गुरुदक्षिणा रुपात दिल्या जाणाऱ्या धनातून. ते देणारी कुणी धनवान व्यक्ती नाही, उद्योग नाही की शासनयंत्रणा नाही. संघाचं काम अनेकांना बुचकळ्यात टाकणारं ठरतं ते यामुळे. डॉक्टरांनी मांडलेला विचार संघ स्वयंसेवक जगले आहेत. त्या वाक्यांचं, विचारांचं, त्यांच्या शब्दांचं सामर्थ्य ते हयात असताना जितकं होतं, तितकंच ते आजही आहे, संघ कार्यातली ही विचार-नवलाई आहे. सहसा असं आढळत नाही. संस्थेचं-संघटनेचं नेतृत्व करणारी व्यक्ती बदलली की दिशा बदलते, आग्रह पातळ होतात. तसं संघाच्या बाबतीत घडलेलं नाही हे संघाचं वेगळेपण आहे. वेगळा विचार मांडणारी माणसं त्या त्या काळात संघाकामापासून बाजूला झाली, पण संघ तसाच अभेद्य राहिला, आणि काळाच्या ओघात आता या विचाराचा स्वीकार करायला हरकत नाही, तो करण्याइतका संघ परिपक्व झाला आहे, असं वाटून संघानं त्यांची त्या काळात दाखवलेली वाट स्वीकारलीही आहे. तेव्हा बाजूला झालेले ते बंडखोर कार्यकर्ते देखील कालांतरानं पुन्हा संघाजवळ आले आहेत, ही संघाच्या कार्यपद्धतीतील संघटन-नवलाई आहे.

बाबाराव भिडे हे निष्णात वकील, महाराष्ट्र प्रांताचे संघचालक. ते म्हणायचे संघ म्हणजे शाखा, आणि शाखा म्हणजे कार्यक्रम. ते म्हणायचे संघ काही करणार नाही, पण सगळं काही होईल. एखादी गोष्ट संघ कार्यकर्त्यानं ठरवली म्हणजे ती होणार म्हणजे होणारच. संघ स्वयंसेवकाविषयी, संघ कार्यपद्धतीविषयी इतका आत्मविश्वास हीच तर संघकार्याची नवलाई आहे, हेच तर संघकार्याचं वेगळेपण आहे.

**-सुधीर जोगळेकर**
sumajo51@gmail.com

# ‘डब्ल्यूटीसी’ फायनलची शर्यत रोमांचक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडिया आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या गेलेल्या गाबा टेस्ट मॅचनंतर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीची शर्यत अधिकच रोमांचक बनली आहे. या दोन संघांशिवाय दक्षिण आफ्रिकाही अंतिम फेरीत पोहचण्याचा मोठा दावेदार बनला आहे, मात्र या तिन्ही संघांसाठी अंतिम फेरी गाठण्याचा मार्ग सोपा असणार नाही.

तिसरी कसोटी अनिर्णित राहिल्याने गतवेळचा चॅम्पियन ऑस्ट्रेलियालाही अंतिम फेरीच्या शर्यतीतून बाहेर पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. बॉर्डर-गावसकर ट्रॉफीचे शेवटचे दोन सामने आणि श्रीलंकेविरूद्धची मालिका ऑस्ट्रेलियासाठी खूप महत्त्वाची असणार आहे, पण ‘कांगारू’वर मात आणि शेजारी देश श्रीलंकेची साथ मिळाल्यास टीम इंडिया ऑस्ट्रेलियाला कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यातून बाहेर करू शकते.

बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आतापर्यंत तीन सामने खेळले गेले आहेत, ज्यामध्ये ऑस्ट्रेलियाने एक सामना जिंकला आणि एक पराभव पत्करला आहे, तर एक सामना अनिर्णित राहिला. अशा परिस्थितीत आता या मालिकेत दोन सामने शिल्लक आहेत. ऑस्ट्रेलियाला कोणत्याही संघावर अवलंबून न राहता अंतिम फेरी गाठायची असेल, तर उर्वरित दोन सामने कोणत्याही परिस्थितीत जिंकावेच लागतील. ऑस्ट्रेलिया जर दोन्ही सामने जिंकण्यात यशस्वी झाला तर थेट फायनलमध्ये आपले स्थान निश्चित करेल. दुसरीकडे भारताने या दोनही सामन्यात ‘कांगारु’वर मात केली तर ऑस्ट्रेलिया बाहेर होईल, पण या सामन्यातील दोनपैकी एकजरी सामना ऑस्ट्रेलियाने हरला किंवा अनिर्णित राहिला तर ऑस्ट्रेलियाला पुढील श्रीलंका कसोटी मालिकेवर अवलंबून राहावे लागेल.

भारताने ऑस्ट्रेलियाविरूद्ध उर्वरित दोनपैकी एक सामना जिंकला तर सारा खेळ श्रीलंकेवर अवलंबून असेल. भारत-ऑस्ट्रेलिया मालिका २-२ अशी बरोबरीत संपली, तर ऑस्ट्रेलियाला श्रीलंकेला व्हाईटवॉश द्यावा लागेल. मगच ते अंतिम फेरी गाठू शकतील. अशा वेळी भारताला शेजारी देश श्रीलंकेच्या मदतीने ऑस्ट्रेलियाचा ‘पत्ता कट’ करता येईल. श्रीलंकेने ऑस्ट्रेलियाविरूद्धचा एक जरी सामना अनिर्णित ठेवला तरीही ऑस्ट्रेलिया स्पर्धेबाहेर होईल आणि भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका असा अंतिम सामना रंगेल.

ऑस्ट्रेलिया किंवा भारतापेक्षाही आफ्रिकेचा मार्ग अधिक सोपा आहे, कारण दक्षिण आफ्रिकेला अंतिम फेरी गाठण्यासाठी दोनपैकी फक्त एका कसोटी सामन्यात पाकिस्तानला पराभूत करणे आवश्यक आहे.

# रिटघर विद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक क्रीडा महोत्सव झाला. त्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन सरपंच सुभाष भोपी, मुख्याध्यापक श्री. साळुंखे तसेच स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य बाळाराम भोपी, बळीराम भोपी, राजेश भोपी, वंदना भोपी, प्रल्हाद भोपी, वासुदेव भोपी, दीपक पाटील (पोलीस पाटील), भालचंद्र भोपी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून व हायड्रोजन फुगे हवेमध्ये सोडून करण्यात आले.

या वेळी पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आंतरवर्गीय खो-खो, कबड्डी, धावणे, गोळाफेक, भालाफेक, लंगडी इ. खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या.

दोन दिवसीय क्रीडा महोत्सवात यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षकांनी योगदान दिले. क्रीडा प्रमुख अमित पाटील यांनी स्पर्धांचे समालोचन केले, तर अन्य शिक्षकांनी पंचाचे काम पाहिले. या वेळी लोक उपस्थित होते.

# जय भारत, गुड मॉर्निंग, अमर क्रीडा, लायन्स स्पोर्टस् संघ उपांत्य फेरीत

**कबड्डी महोत्सव**



**मुंबई : प्रतिनिधी**

जय भारत मंडळ, गुड मॉर्निंग स्पोर्टस्, अमर क्रीडा, लायन्स स्पोर्टस् या संघांनी बळीराम क्रीडा मंडळाने आयोजित केलेल्या पुरुष प्रथम श्रेणी गटाची उपांत्य फेरी गाठली. जय भारत विरुद्ध गुड मॉर्निंग, तर अमर क्रीडा मंडळ विरुद्ध लायन्स स्पोर्टस् अशा उपांत्य लढती होतील.

काळाचौकी आंबेवाडी येथील बळीराम मंडळाच्या पटांगणावर सुरू असलेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात जय भारत मंडळाने दुर्गामाता स्पोर्टस्‌ला ३४-११ असे सहज नमविले. आक्रमक सुरुवात करणाऱ्या जय भारतने पहिल्या काही मिनिटातच लोण देत ११-०१ अशी आघाडी घेतली. विश्रांतीला १९-०८ अशी मोठी आघाडी जय भारतकडे होती. विश्रांतीनंतर आणखी एक लोण देत त्यांनी आपला विजय सोपा केला. निखिल पाटील, अविनाश कावीलकर यांच्या झंझावाती खेळाला या विजयाचे सारे श्रेय जाते. दुर्गामाताच्या रूपेश महावरेची या सामन्यात मात्रा चालली नाही.

गुड मॉर्निंग स्पोर्टस्‌ने श्रीराम क्रीडा विश्वस्त संघाचा कडवा प्रतिकार ४२-३३ असा मोडून काढला. पहिल्या डावात लोण देत २१-१२ अशी आघाडी घेणाऱ्या गुड मॉर्निंगला दुसऱ्या डावात श्रीरामने चांगलेच झुंजविले. सामना संपायला काही मिनिटे शिल्लक असताना श्रीरामाने लोण देत व गुण घेत ही आघाडी ३३-३८ अशी कमी करीत आणली, पण वेळेचे गणित साधता न आल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. शार्दुल पाटील, साहिल राणे यांनी गुड मॉर्निंगकडून, तर तुषार शिंदे, अंकुश पार्ले यांनी श्रीरामकडून उत्कृष्ट खेळ केला.

अमर क्रीडा मंडळाने बंड्या मारुतीचे आव्हान ३५-२६ असे परतवून लावले. सावध व संयमी खेळ करीत मध्यांतराला १९-१५ अशी आघाडी घेणाऱ्या अमर संघाने नंतरदेखील तोच पवित्रा अवलंबित विजय साकारला. करण सावर्डेकर, सिद्धेश जावरे यांच्या दमदार चढाया, त्याला आकाश डोंगरेची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे शक्य झाले. शुभम चौगुले, जितेश सापते यांनी बड्या मारुतीकडून बऱ्यापैकी प्रतिकार केला.

शेवटच्या सामन्यात लायन्स स्पोर्टस्‌ने शिवशक्ती मंडळाला ३९-३४ असे नमवित उपांत्य फेरी गाठली. झंझावाती सुरुवात करीत दोन लोण देत लायन्सने पूर्वार्धात २५-१६ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात सावध खेळ करीत ही आघाडी टिकवित आपल्या विजयावर शिक्कामोर्तब केले. राज आचार्य, हर्ष मोरे यांच्या धडाकेबाज चढाया, तर शुभम मटकर याचा बचाव या विजयात महत्त्वपूर्ण ठरला. शिवशक्तीच्या वैष्णव सूर्यवंशी, अभिषेक किर यांनी उत्तरार्धात कडवा प्रतिकार केला, पण तोपर्यंत वेळ निघून गेली होती. त्यामुळे हा संघ पराभूत झाला.

## माजी क्रिकेटपटू रॉबिन उथप्पाविरुद्ध अटक वॉरंट

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ)मध्ये



फसवणूक केल्याच्या आरोपावरून भारताचा माजी क्रिकेटपटू रॉबिन उथप्पाविरुद्ध अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. हे वॉरंट कथितपणे कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा न केलेल्या २३.३६ लाख रुपयांच्या रकमेशी संबंधित आहे. उथप्पा सेंटॉरस लाइफस्टाइल ब्रँड्स प्रा.लि. चा संचालक असल्याच्या वेळचे हे प्रकरण आहे.

कर्नाटकातील पुलकेशीनगर पोलिसांना या अटक वॉरंटची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले होते. पोलिसांनी स्पष्ट केले की, उथप्पा वॉरंटमध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर वर्षभरापासून राहत नाही आणि तो सध्या तो दुबईत आहे. पोलिसांनी हे वॉरंट केआर पुरम येथील पीएफ कार्यालयात परत पाठवले आहे.

# नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय महिला टेनिस स्पर्धा




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई स्पोर्ट्‌स असोसिएशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला टेनिस स्पर्धा वाशी येथील असोसिएशनच्या टेनिस कोर्टवर सुरू आहे. या स्पर्धेत ५७ महिला खेळाडूंनी भाग घेतला असून यामध्ये २७ आंतरराष्ट्रीय आणि ३० भारतीय महिला खेळाडूंचा सहभाग आहे.

या वर्षी या स्पर्धेचे ११वे वर्ष आहे. विजेत्या स्पर्धकांना ४० हजार डॉलर्सची रक्कम देण्यात येणार आहे. स्पर्धेत आंतरराष्ट्रीय टेनिसमध्ये मानांकन असलेल्या महिला खेळाडू रशिया, इंडोनेशिया, जपान, कझाकिस्तान, फ्रान्स, फिनलँड, ग्रीस, थायलंड, चीन, पोलंड, इजराइल, लनीवा येथून खेळण्यासाठी नवी मुंबईत दाखल झाल्या आहेत. त्याचप्रमाणे भारताच्या मानांकन असलेल्या अंकिता रैनासह ३० महिला खेळाडूंनी भाग घेतला आहे.

या स्पर्धेत सिंगलसाठी सेमी फायनल होणार आहे. ही लढत फनग्रन टियान चीन, थासापार्क निकलो थायलंड, एकटेरीना रेनगोल्ड रशिया, प्रिसका गुगरहो इंडोनेशिया या चार स्पर्धकांमध्ये होणार आहे, तर डबलची फायनल भारताच्या रिया भाटिया व झील देसाई विरुद्ध कनाको मोरीसकी व नाहो सनो जपान यांच्यामध्ये होणार आहे.

आंतरराष्ट्रीय तसेच भारतीय महिला टेनिस खेळाडूंचा खेळ पाहण्याची नवी मुंबईकरांना सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे. या स्पर्धेसाठी निधी जमा करण्यात येत असून थोड्या प्रमाणात क्लबचे पैसे वापरले जात असल्याची माहिती आयटीएफ स्पर्धेचे संचालक व नवी मुंबई स्पोर्ट्‌स क्लबचे उपाध्यक्ष डॉ. दिलीप राणे यांनी दिली.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ रविवारी (दि. २२) नवी मुंबई स्पोर्ट्‌स असोसिएशनच्या टेनिस ग्राउंडवर राज्याचे मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते होणार आहे.

## मॅकस्वीनीच्या जागी सॅम कोन्सटासला संधी

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

प्रतिष्ठेच्या बॉर्डर-गावसकर करंडकासाठीच्या कसोटी क्रिकेट मालिकेतील अखेरच्या दोन सामन्यांसाठी ऑस्ट्रेलियाच्या संघात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. सलामीवीराच्या स्थानासाठी नेथन मॅकस्वीनीच्या जागी १९ वर्षीय सॅम कोन्सटासची निवड करण्यात आली आहे.

भारताविरुद्धच्या या मालिकेतच आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी मिळालेल्या मॅकस्वीनीला ऑस्ट्रेलियाच्या संघातून वगळण्यात आले आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियाचा अनुभवी वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड पायाच्या दुखापतीमुळे अखेरच्या दोन कसोटीत खेळू शकणार नाही. त्यामुळे जाय रिचर्डसन आणि शॉन ॲबट यांचे कसोटी संघात पुनरागमन झाले आहे. रिचर्डसनने अखेरचा कसोटी सामना २०२१-२२च्या ॲशेस मालिकेत खेळला होता.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com